# रामायण

## काही अभ्यास आणि विचार

प्रभाकर फडणीस



# रामायण

## काही अभ्यास आणि विचार

## प्रभाकर फ़डणीस

ई साहित्य प्रतिष्ठान

रामायण : काही अभ्यास आणि विचार


लेखक : प्रभाकर फ़डणीस

Email: prabhakar365@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



## प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820

प्रकाशन :१५ सप्टेंबर २०१६



©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी - घेणे आवश्यकआहे.

# प्रस्तावना.

मी रामायण वाचावयास घेतले याचे कारण असे कीं विदर्भ-मराठवाडा कंपनीने रामायणाचे समग्र भाषांतर नव्याने करून घेऊन त्याचे सर्व खंड क्रमाने प्रसिद्ध केले, ते आमच्याकडे विकत घेतले गेले. मी निवृत्त झालो होतो. वेळ हाताशी होता. पूर्वी लहानपणापासून अर्थातच रामकथा परिचित होतीच. रामराज्य सिनेमा तुफान चालला होता तो पाहिला होताच. इतरहि काही किरकोळ वाचले होते पण सर्व रामायण वाचून पहावे असे वाटले व सुरवात केली. जसे वाचत गेलो तसे अनेक नवनवे उल्लेख व पूर्वकल्पनांना छेद देणारे प्रसंग दिसू लागले. मग काही माहिती लिहून ठेवणे सुरू झाले. ही सवय निवृत्तीनंतरच्या सर्वच वाचनाबद्दल लागली होती. मग मला आढळलेल्या नव्या गोष्टी इतराना सांगाव्या अशी ऊर्मि स्वस्थ बसूं देईना.

महाभारताबाबत असाच प्रकार झाला होता व मी एक ब्लॉग सुरू केला होता. रामायणावरहि लिहावयाचे तर आपला हक्काचा ब्लॉग हवा म्हणून सुरू केला. लिहीत गेलो, वाचक मिळत गेले.

किष्किंधा कांडापर्यंत अशा प्रकारे लेखन झाले पण काही कारणाने तेथेच थांबले. उरलेले रामायण अर्थातच वाचले होते व लिहायसारखे सुचतहि होते पण ते राहिलेच!

काही वर्षे गेली. आतां माझे वास्तव्य मुख्यत्वे अमेरिकेत मुलांकडे असते. आता पुस्तकेहि मला उपलब्ध नाहीत त्यामुळे आणखी लिहिणे होणार नाही. पहिल्या चार कांडांवरचे लेखन आपणासमोर ठेवले आहे. वाचकांस आवडेल अशी आशा

# अर्पणपत्रिका

हे पुस्तक उत्तुंग प्रतिभेच्या

श्री वाल्मिकी मुनींना

सादर अर्पण

प्रभाकर फ़डणीस

या पुस्तकात लिहिलेले तर्क व विचार हे लेखकाचे स्वतःचे असून त्यामागे कोणाच्याही भावना दुखावण्याचा हेतू नाही.

या पुस्तकातील कोणत्याही भागाबद्दल काही प्रतिक्रिया असल्यास कृपया prabhakar365@gmail.com किंवा esahity@gmail. com यांवर संपर्क करावा. आपल्या सूचना, टिका, आक्षेप वगैरेंचे स्वागतच आहे.

वादे वादे जायतो तत्त्वबोधः.

प्रकाशक

# बालकांड

रामायणाचे माझे वाचन मर्यादितच आहे. विदर्भ-मराठवाडा कंपनीने प्रकाशित केलेले रामायणाचे भाषांतराचे पांच खंड मला वाचावयास मिळाले. त्यांत वाल्मिकि-रामायणाची मूळ कथा विद्वान संपादकांनी अभ्यासपूर्वक भाषांतर करून छापलेली आहे. त्यांचे भाषांतर अचूक आहे व उत्तम आहे असे मी गृहीत धरलेले आहे. माझा संस्कृतचा अभ्यास नसल्यामुळे तसे करण्यावाचून पर्याय नाही! रामायणाची इतर अनेक भाषांतरे व आवृत्त्या जगभर प्रसिद्ध झाल्या आहेत. रामकथेचे स्वरूप या ग्रंथांतून देशोदेशीं भाषा, काळ, लेखक, संस्कृति यानुरूप बदलत आले आहे. यांचा तौलनिक अभ्यास हे महा-विद्वानांचे काम आहे, माझे नव्हे, तेव्हां त्या भानगडीत न पडतां, मूळ वाल्मिकि रामायणाचे समोर असलेले भाषांतर आपल्याला पुरेसे आहे असे मी ठरवले.

प्रत्यक्ष रामकथा आपल्याला सर्वसाधारणपणे परिचित असते. अनेक महाकाव्यें, नाटकें, कादंबऱ्यांना तिने जन्म दिला आहे. साधारण्पणे श्रद्धा बाळगून, जशी कथा वाचनात येईल तशी खरी मानण्याकडे, आपला कल असतो. राम हा प्रत्यक्ष ईश्वराचा अवतार अशी दृढ श्रद्धा असली म्हणजे तर्क चालवण्याची गरज राहत नाही. माझ्या मनाचा कल तसा नसल्यामुळे काही विचार, शंका वा कल्पना उभ्या राहतात.

माझ्या या रामायणावरील लेखनातह श्रद्धा आवश्यक तेथे दूर ठेवून, पूर्वग्रह न बाळगतां, वाचन करताना काही नवीन वा पूर्वसमजुतीपेक्षां वेगळया कथा वा घटना नजरेला आल्या त्याबद्दल मी लिहिणार आहे. कोणाच्याही श्रद्धा दुखवण्याचा वा त्यांचा अनादर करण्याचा अर्थातच माझा हेतु नाही, तरीहि तसे झाल्यास मी प्रथमच दिलगिरी व्यक्त करतों.

रामायणात, महाभारताप्रमाणे अनेक उपकथानके, स्थळवर्णने, यात्रा, धार्मिक कृत्ये यांची रेलचेल आहे. काही उपकथानके दोन्ही ग्रंथांत समान आहेत, मात्रा त्याचे स्वरूप काही वेळां दोन्हीकडे एकच नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे.

बालकांड हे रामायणाचे पहिले कांड. त्याचे ७७ सर्ग आहेत. त्यांत राम व त्याचे तीन बंधु यांच्या जन्मापासून त्यांच्या विवाहापर्यंत कथाभाग येतो. याबरोबरच रामाच्या कुळाची पूर्वपीठिका व इतर अनेक उपकथानके आहेत. सुरवातीच्या सर्ग १ मध्ये नारदाने वाल्मिकीला रामकथा सांगितली आहे. वाल्मिकीने नारदाला विचारले कीं सांप्रत सर्वगुणानी संपन्न असा कोण पुरुष आहे? त्यावर नारदाने राम असे म्हणून त्याचे वर्णन केले व संक्षिप्त रामकथा सांगून 'सद्ध्या राम व सीता अयोध्येत राज्य करीत आहेत' असे म्हटले. वर्तमानकाळाचा वापर दर्शवितो कीं रामाने सीतेचा त्याग करण्याअगोदरची ही घटना आहे. राम दीर्घकाळ राज्य करील असे नारदाने म्हटले. या अतिसंक्षिप्त रामकथेत व पुढील विस्तृत रामायणामध्ये साहजिकच काही फरक दिसून येतात. राम वनात गेला तेव्हा दशरथ त्याला पोचवण्यासाठी दूरवर बरोबर गेला असे येथे म्हटले आहे! रामाने विश्वामित्राबरोबर जाणे, ताटकावध, धनुर्भंग वगैरे येथे काही नाही! वालीसुग्रीवाची राजधानी किष्किंधा हिचे वर्णन 'गुहा' असे केले आहे.

दुसऱ्या सर्गामध्ये प्रख्यात असा क्रौंचवधप्रसंग व वाल्मिकिची पहिल्या 'मा निषाद प्रतिष्ठां त्वम ...' या श्लोकाची रचना वर्णिली आहे. आपण काहीतरी नवीनच केले असे वाल्मिकीला वाटले तेव्हाच खुद्द ब्रह्मदेवाने प्रगट होऊन श्लोकरचनेबद्दल वाल्मिकीचे अभिनंदन केले व 'तसे करण्याची मीच तुला प्रेरणा दिली, आता संपूर्ण रामकथा तूं श्लोकबद्ध कर' अशी त्याला आज्ञा केली. रामायण रचनेमागची ही पार्श्वभूमि या दोन सर्गांत वर्णिली आहे.

सर्ग तीन मध्ये रामायणाची सर्व कथा पुन्हा एकदा संक्षिप्त स्वरूपांत वाल्मिकीने स्वत:च्या शब्दांत सांगितली आहे. येथे मात्र कथेचा शेवट प्रजेच्या समाधानासाठी रामाने सीतेचा त्याग करण्यापर्यंत नेला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. रामाने त्यागिल्यानंतर सीता दीर्घकाळपर्यंत वाल्मिकीच्याच आश्रमात राहिली व लवकुशांचा जन्म व सर्व संगोपन तेथेच झाले त्यामुळे राम-सीता यांनी दीर्घकाळपर्यंत राज्य केले हा नारदाने सांगितलेला रामकथेचा शेवट खरा नाही हे वाल्मिकीला ठाऊकच होते.

पहिला सर्ग व तिसरा सर्ग यांमध्ये १३-१४ वर्षांचा काळ लोटला असे दिसते. कदाचित नारदाने रामकथा सांगितली तेव्हा राम-सीता आता दीर्घकाळ राज्य करतील अशी नारदाची अपेक्षा असावी!

उत्तर-रामचरित्र हा रामायणाचा भाग मानावयाचा कीं नाही हा एक विद्वानांचा वादविषय आहे अशी माझी कल्पना आहे. रामायण वाल्मिकीने प्रथम रचले व लवकुशांना शिकविले तेव्हा सीतेच्या त्यागाचा सुरवातीचा कथाभाग त्यांत कदाचित समाविष्ट असावा. लवकुशांनी अयोध्येत जाऊन ते लोकांना व नंतर खुद्द रामाला ऐकविले. त्यानंतर राम स्वत: वाल्मिकीच्या आश्रमांत आला, सीतेची भेट झाली व वाल्मिकीने सीतेबद्दल सर्वतोपरी आश्वासन दिले तरीहि रामाने सीतेचा स्वीकार केला नाहीच व संशयही पूर्णपणे सोडला नाही. तेव्हां निराशेने सीता भूमिगत झाली व शोकाकुल राम लवकुशांना घेऊन अयोध्येला परत गेला हा अखेरचा कथाभाग तर मूळ रामायण रचनेच्या वेळी घडलेलाच नव्हता त्यामुळे तो मूळच्या रामायणांत समाविष्ट असण्याचा संभवच नाही. मात्र त्यानंतर केव्हातरी वाल्मिकीने स्वत:च वा इतर कोणाकडून तरी हा कथाभागहि रामायणात समाविष्ट केला असावा. अर्थात तो रामकथेचा अनिवार्य भागच आहे. रामाने सीतेचा केलेला कायमचा त्याग हा योग्य कीं अयोग्य, न्याय्य कीं अन्याय्य हा एक कूट्प्रष्न आहे व रामावर अतीव श्रद्धा बाळगणारांनाहि तो अवघडच आहे.

वाल्मिकीने श्लोक व अनुश्टुभ छंद पहिल्याने रचला कीं इतर पूर्वीची कांही रचना त्या छंदांत आहे हे मला माहीत नाही. मात्र वेद, उपनिषदे रामायणाच्या खूप पूर्वीचीं व त्यांत काव्यमय व गेयहि रचना – सूक्तें- आहेत अशी माझी समजूत आहे. तसे असेल तर मग रामायणाला आदिकाव्य कां म्हणतात असा मला प्रश्न आहे.

सर्ग ४ मध्ये वाल्मिकीने सर्व रामकथा सात सर्गांत रचली असे म्हटले आहे व त्यांत उत्तरकांडाचाही समावेश आहे. नंतर तें लवकुशांना शिकवले गेले व त्यांचेकडून त्याचे गायन फार परिणामकारक होते असे सर्व मुनिगणांचे मत होऊन सर्वांनी त्याना कौतुकाने काही भेटवस्तू दिल्या. त्यांत छाटी, लंगोटी, रुद्राक्षांची माळ अशा नामी वस्तूंचा समावेश होता! लवकुश अयोध्येच्या रस्त्यांतून रामायण गात फिरत असतांना खुद्द रामानेच त्यांना दरबारांत नेऊन त्यांचे कौतुक व सन्मान केला व सर्व रामायण गाण्याची त्यांना आज्ञा केली. त्यावेळी त्यांनी गाइलेली रामकथा म्हणजे पुढील सर्व सर्गांत व उत्तरकांड सोडून इतर कांडांत आलेले रामायण होय. इथून पुढे, लवकुशांचा वा दरबाराचा उल्लेख न करतां सर्व रामकथा क्रमवार सांगितली आहे. सर्वसाधारणपणे सर्व रामकथा आपल्या सर्वांच्या भरपूर

परिचयाची असल्यामुळे ती सर्व क्रमाने सांगण्याचा माझा विचार नाही. रामायण वाचताना कित्येक ठिकाणी आपल्याला आश्चर्याचे धक्के बसतात व आपले दीर्घकाळचे काही समज चुकीचे असल्याचे दिसून येते. बालकांडांतील व पुढे इतर कांडांतीलहि अशा प्रसंगांवर लिहिणार आहे.

दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी पुत्रकामेष्टि यज्ञ केला अशी आपली समजूत असते. प्रत्यक्षात त्याने अश्वमेध केला. यावेळी दशरथाचे वय काय असावे? पुढे विश्वामित्राच्या आगमनाचे वेळी 'आपण साठ वर्षांचे आहोत व राम जेमेतेम सोळा वर्षांचा आहे' असे तो म्हणाला. यावरून यज्ञाचे वेळी तो साधारण ४२-४३ वर्षांचा होता. म्हणजे अपत्ये होण्याचें त्याचें वय गेलेलें नव्हतें. मात्र तीन विवाह करूनहि पुत्रप्राप्ति झाली नव्हती. पुढे उल्लेख आहे कीं तीन राण्यांशिवाय त्याचा इतरहि बराच राणीवसा होताच! थोर असे वसिष्ट ऋषि राजाचे दरबारात असूनहि अश्वमेधाची जबाबदारी त्यानी स्वीकारली नाही! त्यासाठी ऋष्यशृंग ऋषीना बोलावून घ्यावे असा त्यानी दशरथाला सल्ला दिला. त्यानी असे कां केले असावे? दशरथाचा यज्ञ नेहमींचा अश्वमेध नव्हता. पुत्रप्राप्ति हा हेतु होता. पुत्रप्राप्तीच्या हेतूने करावयाच्या यज्ञामध्ये काही गौणत्व मानले जात होते काय? महाभारतातहि, द्रुपदाचा यज्ञ करण्यास कोणी ब्राह्मण / ऋषि तयार नव्हता असे म्हटले आहे. कदाचित या गौणत्वामुळेच वसिष्ठाने स्वत: यज्ञ चालवला नसावा.

या ऋश्यशृंगाची कथा मजेदार आहे. जन्मापासून तो वनात पिता व इतर ऋषिमुनि यांच्याच सहवासात वाढला होता. त्यामुळे त्याला स्त्रीरूप माहीतच नव्हते! रोमपाद नावाच्या राजाच्या राज्यात दीर्घकाळ दुष्काळ पडला होता व 'ऋष्यशृंग तुझ्या राज्यात रहावयास आला तर त्याच्या पुण्याईने पाऊस पडेल' असे त्याला सांगण्यात आले. त्याला मोहात पाडून घेऊन येण्याची कामगिरी वेश्यांकडे सोपवली गेली. त्यांना पाहून, या स्त्रिया हे न कळल्यामुळे हे कोणी वेगळयाच प्रकारचे मुनि आहेत असे त्याला वाटले! मात्र रोमपादाच्या इच्छेप्रमाणे ऋष्यशृंग त्याच्या राज्यात आला व मग त्याच्या पुण्याईने रोमपादाचे पाप नष्ट होऊन पाऊस पडला! रोमपादाने आपली कन्या शांता त्याला दिली व ऋश्यशृंग त्याचेपाशी राहिला. दशरथाने आमंत्रण दिले त्याचा मान ठेवून रोमपादाने ऋश्यशृंगाला त्याचेकडे पाठवले. पूर्ण एक वर्षभर तयारी चालून मग दशरथाचा अश्वमेध झाला. त्याची कथा पुढील भागात पाहूं.

दशरथाच्या यज्ञाला राजा जनक 'जुना संबंधी' या नात्याने आला होता. म्हणजे दोन्ही कुळांचा राम-सीता विवाहापूर्वींहि संबंध होता असे दिसते. कैकय राजा, कैकेयीचा पिता, हाहि उपस्थित होता. कौसल्या वा सुमित्रा यांच्या माहेरच्या कुळांचा उलेख नाही. कौसल्या, तिच्या नावावरून कोसल देशाची राजकन्या असावी असे म्हणता येईल. सुमित्रा कोठली याचा मात्र खुलासा कोठेच नाही. दशरथाने तिच्याशी विवाह सौंदर्यामुळे वा पुत्रप्राप्तीसाठी केला असावा.

यज्ञीय अश्व एक वर्षानंतर परत आला. अश्वाबरोबर दशरथ स्वत: ससैन्य गेलेला नव्हता. मुलगे नव्हतेच तेव्हा प्रश्नच नव्हता. मात्र कोणाबरोबरहि युद्धप्रसंग उद्भवला नाही. दशरथाबद्दल इतर राजाना आदर असावा. यानंतर यज्ञाचे खुलासेवार वर्णन आहे. अनेक पशूंचे बळी दिले गेले. अश्वमेधातील एक विचित्र प्रथा म्हणजे यज्ञाचे शेवटी अश्वाशेजारी राणीने एक रात्र शयन करणे! या प्रथेचा उल्लेख महाभारतातहि द्रुपदाच्या यज्ञाच्या संदर्भात आहे. यामागे काय तत्व असावे हे कळत नाहीं. यानंतर त्याच अश्वाचा यज्ञात बळी देऊन यज्ञ समाप्त झाला. ऋष्यशृंगाने राजाला 'तुला चार पुत्र होतील' असा आशीर्वाद दिला. दशरथाला एकहि पुरला असता! एकच मिळाला असता तर राम वनात गेलाच नसता व रामायणच झाले नसते! येथे दशरथाच्या वैश्य व शूद्र स्त्रियांचा उल्लेख आहे. त्यानंतर पुत्रेष्टि हा स्वतंत्र यज्ञ अथर्ववेदाच्या मंत्रांनी केला गेला. पुत्रप्राप्तीसाठी करावयाचा हा यज्ञ बहुधा गौण मानला जात असावा म्हणून वसिष्ठांनी स्वत: न करता ऋश्यशृंगाला बोलावले. अश्वमेधाचे निमित्तने दशरथाने त्याला अपार धन दिले व मग त्याने पुत्रेष्टि यज्ञ करून दिला असा प्रकार दिसतो!

यज्ञात प्रजापतिलोकांतील पुरुष प्रगट झाला व त्याने क्षीरपात्र दशरथाला देऊन 'ही खीर तुझ्या योग्य त्या पत्नीला दे' असें म्हटले. खिरीची वांटणी करताना, दशरथाने अर्धी कौसल्येला, पाव सुमित्रेला व अष्टमांश कैकेयीला दिली व उरलेली अष्टमांश, काही विचार करून, पुन्हा सुमित्रेलाच दिली. असा कोणता विचार त्याने केला असेल बरे?

खिरीची वांटणी करताना दशरथाने राण्यांच्या सीनियॉरिटीला प्राधान्य दिलेले दिसते. यज्ञाला कैकय राजा उपस्थित होता. खिरीच्या वांटणीत आपल्या मुलीला फक्त अष्ट्मांश वाटा मिळाला याबद्दल त्याने राग वा तक्रार केलेली नाही! खुद्द कैकेयीनेहि तक्रार केली नाही. यामुळे ती दुष्ट वा मत्सरी होती या समजुतीला आधार दिसत नाही. मला तर ती भोळी-भाबडी वाटते!

यापुढच्या सर्ग १७ मध्ये अनेक देवांनी याचवेळी अनेक वानरवीरांना जन्म दिला असा खुलासेवार उल्लेख केला आहे. त्यांत सर्व प्रमुख वानरवीरांचा उल्लेख आहे. यातील अद्‌भुतरस मी सोडून देतो. वाली हा इंद्रपुत्र व सुग्रीव हा सूर्यपुत्र असे म्हटले आहे. त्यावरून ते जुळे भाऊ नव्हते हें उघड आहे. मात्र ते दिसावयास अतिशय सारखे असल्यामुळे पुढे द्वंद्वयुद्ध करणाऱ्या दोघांपैकी वाली कोण व सुग्रीव कोण हे रामाला ओळखू येईना व पहिल्या प्रयत्नाचे वेळी वालीला मारता आले नाही असे वर्णन केले आहे. पुन्हा द्वंद्व करताना सुग्रीवाने गळयात पुष्पमाला घातली व मग रामाला वालीवर बाण सोडतां आला. या प्रसंगामुळे ते जुळे भाऊ असावेत असा समज होतो तो खरा नाही. पुढे महाभारतात अर्जुन हा इंद्रपुत्र व कर्ण हा सूर्यपुत्र असे वर्णन आहे मात्र त्यांना कोणी वाली-सुग्रीवांचे अवतार मानत नाही! कारण ते पडले वानर! दोन्ही ठिकाणी इंद्रपुत्र जास्त प्रबळ वर्णिला आहे.

यज्ञाच्या प्रभावाने म्हणा कीं यदृच्छेने म्हणा पण दशरथाला राम, भरत, लक्ष्मण व शत्रुघ्न असे चार पुत्र पाठोपाठ झाले. त्यांच्या वयामध्ये किती फरक होता याचा स्पष्ट उल्लेख कोठेच केलेला नाही. सुमित्रेने लक्ष्मण व शत्रुघ्न यांना जन्म दिला असे म्हटले आहे पण ते जुळे होते असे स्पष्ट म्हटलेले नाही. पण पाठोपाठ जन्म झालेले असल्यामुळे ते जुळे असलेच पाहिजेत. यज्ञानंतर एक वर्षाने रामाचा जन्म झाला व चौघांचाहि नामकरण विधि एकदमच झाला असे म्हटले आहे. लक्ष्मण व शत्रुघ्न यांचा जन्म आश्लेषा नक्षत्रावर व कर्कलग्नी झाला या वर्णनावरूनहि ते जुळे असले पाहिजेत याला दुजोरा मिळतो. तसें नसतें तर एकाच नक्षत्रावर जन्म घेण्यासाठी त्यांच्या वयात एखाद्या वर्षाचा फरक पडला असता. राम व भरत या दोघांच्याहि जन्मराशि व जन्मनक्षत्रे दिलीं आहेत. राम पुनर्वसु नक्षत्रावर व कर्कलग्नीं तर भरत पुष्य नक्षत्रावर व मीनलग्नीं जन्मला. रामाचा जन्म माध्यान्हीला झाला हे सर्वमान्य आहे. भरताची जन्मवेळ दिलेली नाही. एवढ्या माहितीवरून त्यांच्या जन्मवेळेत किती फरक होता हे ठरवतां येते काय हे मला निष्चित माहीत नसल्यामुळे थोडेफार ज्योतिष जाणणाऱ्या एका व्यक्तीशी चर्चा केली त्यावरून असे दिसून आले कीं भरत हा रामजन्माच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सुमारास म्हणजे रामानंतर १७-१८ तासांनी जन्मला. लक्ष्मण-शत्रुघ्नांच्या जन्मनक्षत्र-राशीवरून असेच गणित करून ते रामजन्मानंतर दोन दिवसांनी दोन-प्रहरी जन्मले. म्हणजे ते रामाहून दोन दिवसांनी लहान होते. ज्योतिषाची आवड व अभ्यास असणारांनी यावर अधिक प्रकाश टाकावयास हरकत नाही. रामायण काळी आपल्याकडे राशी होत्या काय याबद्दल शंका आहे. त्या बऱ्याच पुढे, वराहमिहिराच्या काळी आल्या (ग्रीकांकडून?) राशिनामे आपलीं व ग्रीकांची एकच आहेत. कोणी कोणाकडून घेतली? मात्र, रामायणानंतर दीर्घकाळाने झालेल्या महाभारतकाळीहि

अधिक मासांचे गणित- आजच्याप्रमाणे-राशिसंक्रमणाशी जुळवलेले नव्हते. ५८ चांद्रमासांनंतर दोन अधिक चांद्रमास एकदम घेतले जात. यावरून, महाभारतकाळीहि राशिकल्पना व राशि-संक्रमण-दिन-निश्चिति माहीत नव्हती म्हणावे लागते. सूक्ष्म वेध घेण्याच्या पद्धति आटोक्यात येईपर्यंत ते शक्यहि नव्हते. रामायणात हे जन्मराशींचे उल्लेख मागाहून घातले गेले काय? हा प्रष्न मी वाचकांवरच सोडतो!

चौघा राजपुत्रांचे बालपण संपण्याच्या सुमारासच विश्वामित्र ऋषि दशरथाकडे आले व यज्ञाला उपद्रव देणाऱ्या मारीच सुबाहु वगैरे राक्षसांचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी रामाची मागणी केली. दशरथ स्वत: एक अक्षौहिणी सैन्य घेऊन मदतीस जाण्यास तयार होता पण विश्वामित्राला रामच हवा होता. वसिष्ठांनी विश्वामित्रांचा सर्व महिमा सांगून त्यांचा हवाला दशरथाला दिला व मग राम-लक्ष्मण विश्वामित्राबरोबर गेले. यावेळी भरत कोठे होता? रामाबरोबर जाण्यासाठी त्याचे नाव पुढे आले नाही. तो कदाचित आजोळी असावा. राम-लक्ष्मण यावेळी १५-१६ वर्षांचे होते. राम अजून १६ वर्षांचाहि झालेला नाही असे दशरथच विश्वामित्राला म्हणाला होता.

यज्ञाला त्रास देणारा मारीच हा सुंद व ताटकेचा पुत्र. सुबाहु हा उपसुंदाचा पुत्र पण ताटकेचा पुत्र असा स्पष्ट उल्लेख नाही. सुंद-उपसुंद हे मोहिनीच्या मोहात पडले व आपसात लढून मेले पण त्याना त्यापूर्वी ताटकेपासून पुत्र झाले होते असे दिसते. ताटका स्वत: सुकेतु यक्षाची कन्या. मग या सर्वांची गणना राक्षसांत कां होते? यज्ञसंस्कृति न मानणारे ते राक्षस असे म्हणावे तर राक्षसराज रावण हा स्वत: यज्ञ करीत असे! अगस्तीच्या शापाने मारीच-सुबाहु राक्षस झाले असे म्हटले आहे. त्यांच्या वर्तणुकीमुळे त्यांची राक्षसांत गणना होत असावी. रामायणातील राक्षस व वानर कोण हे एक न उलगडणारे कोडे आहे. वानर इतरत्र कोठेहि नाहीत. राक्षस मात्र सर्वत्र असतात पण त्यांचे जन्म क्षत्रिय वा ब्राह्मण कुळांत असतात. त्यांच्या मनोवृत्ति वा वर्तणुकीमुळे त्यांची गणना राक्षसांत होत असावी. उदा. रावण, जरासंध वा कंस.

यानंतर येणारी ताटकावधाची, सगर/भगीरथांची व समुद्रमंथनाची कथा मी बाजूस ठेवणार आहे. भगीरथाने गंगा भूमीवर आणणे हे एक रूपक आहे व गंगेचे खोरे शेतीखाली आणण्याशी त्याचा संबंध असावा असा माझा तर्क आहे. समुद्रमंथन कथेमध्ये एक गमतीचा उल्लेख मिळाला. समुद्रमंथनातून बाहेर आलेली सुरा, म्हणजे दारू, ही देवांनी

पळवली, राक्षसांनी नव्हे! सुरा पिणारे ते सुर व न पिणारे ते असुर असे चक्क म्हटले आहे! तेव्हा आपणाला असुर म्हणवून घ्यावयाचे नसेल तर सुरा प्यावी लागेल! पहा बुवा!

यानंतर गौतम-अहल्येची प्रसिध्द कथा पाहूं. जनकाच्या मिथिला नगरीत प्रवेश करण्यापूर्वी उपवनात एक उजाड आश्रम दिसला तेव्हां हा कोणाचा असे रामाने विचारले. त्यावर विश्वामित्राने हा आश्रम गौतमाचा असे म्हणून गौतम अहल्येची कथा रामाला सांगितली. ती आपल्या समजुतीपेक्षां बरीच वेगळी आहे. गौतम बाहेर गेलेले असताना, अहल्येची अभिलाषा धरून इंद्र गौतमवेषाने अहल्येकडे आला. हा गौतम नव्हे, इंद्र आहे हें अहल्येला कळले होते. मात्र तरीहि खुद्द देवराज इंद्र आपली अभिलाषा बाळगतो याचा आनंद व अभिमान वाटून अहल्या इंद्राला वश झाली. हेतु साध्य झाल्यावर मात्र गौतमाच्या भयाने इंद्र पळून जात असतानाच गौतम परत आले. झालेला प्रकार ओळखून त्यांनी इंद्राला रागाने घोर शाप दिला, ज्यायोगे त्याचे वृषण गळून पडले. अहल्येची त्यांनी निर्भर्त्सना केली पण शाप दिला नाही! ती शिळा होऊन पडली नाही. 'आपला संसार संपला, मी निघून जातो आहे. झाल्या गोष्टीचा पश्चात्ताप करीत दीर्घ काळपर्यंत तूं येथेच रहा. कालांतराने तुझ्या दुराचरणाचा दोष तुझ्याच तपाचरणाने पुसून जाईल. पुढे राम येथे येईल ती त्याची कालमर्यादा राहील. त्यांनंतर मी पुन्हा तुझा स्वीकार करीन' असे म्हणून गौतम निघून गेले. गौतमाचे सांगणे मानून अहल्या तेथेच तपाचरण करीत राहिली. ही सर्व कथा सांगून विश्वामित्राने रामाला म्हटले कीं 'अहल्या येथेच आहे तेव्हां तिची भेट घे'. तिचा उद्धार कर वगैरे काही मुळीच सांगितले नाही!

राम लक्ष्मण व विश्वामित्र आश्रमात जाऊन अहल्येला भेटले. रामाने अहल्येला पाहिलें तेव्हां ती दीर्घ तपाचरणामुळे दैदीप्यमान अशी रामाला दिसली. तिने राम-लक्ष्मण व विश्वामित्र यांचा आदर सत्कार केला. राम-लक्ष्मणांनी तिच्या चरणांना स्पर्श करून वंदन केले. तेवढ्यांत गौतमहि येऊन त्यानीहि विश्वामित्राला वंदन केले व अहल्येचा स्वीकार केला. पुढे जनकाच्या नगरीत जनकाचा पुरोहित असलेला गौतम-अहल्यापुत्र शतानंद याने रामाकडून ही सर्व हकीगत समजावून घेऊन मातापित्यांचा समेट झाल्याचे ऐकून समाधान व आनंद व्यक्त केला.

ही कथा जशी रामायणात आहे तशीच, नैसर्गिक, उज्वल व रोचक वाटते. तिचें, अहल्या शापामुळे दीर्घकाळ शिळा होऊन पडणे, रामाच्या पायधुळीमुळे ती पुन्हा मानवरूपात येणे, असे खुळचट स्वरूप कां व केव्हां बनले असावे? रामाला ईश्वरावतार

मानले जाऊ लागल्यावर निव्वळ रामाला मोठेपणा देण्यासाठी झाला असावा. इंद्र भेटीपूर्वीचा शतानंदाचा जन्म, इंद्रभेटीपूर्वीच तो आश्रम सोडून गेलेला होता म्हणजे तेव्हां तो १५-२० वर्षांचा असावा. तो रामाला भेटला तेव्हा त्याचे वर्णन अतिवृद्ध असे केलेले नाही. त्या अर्थी फारतर २०-२५ वर्षे अहल्येने तपाचरणात व्यक्त केली. युगानुयुगे शिळा होऊन पडून राहून रामाची वाट पाहत नव्हे हे निश्चित! 'पाउलातली धूळ होउनी' वगैरे सर्व खोटे! अहल्येची खरी कथा खुद्द वाल्मिकि रामायणात स्पष्ट लिहिलेली असूनहि आपण तिचे भ्रष्ट स्वरूप बिनदिक्कत स्वीकारतो याचे नवल वाटते.

यानंतर धनुर्भंग, राम-सीता विवाह व परशुरामाशी विवाद हा बालकांडाचा अखेरचा भाग पाहण्यापूर्वी विश्वामित्रकथा पाहूं. अहल्येच्या भेटीनंतर राम-लक्ष्मण व विश्वामित्र जनकराजाच्या मिथिलानगरीचे बाहेर उतरले होते. जनकाचा एक यज्ञ चालू होता व त्यानिमित्त ब्राह्मण, ऋषि व शिष्य यांची गर्दी उसळली होती. राजा जनक व पुरोहित शतानंद यांनी विश्वामित्राची भेट घेतली व आदरसत्कार केला. यज्ञाचे उरलेले बारा दिवस येथेच रहा असा आग्रह केला. मग राम-लक्ष्मणांची चौकशी केली. विश्वामित्राने त्यांची माहिती व महती सांगून त्यांना तुझे महान धनुष्य पहावयाचे आहे असे म्हटले. शतानंदाने मातापित्यांची चौकशी केली व मग रामलक्ष्मणांना विश्वामित्रांची सर्व कथा सांगितली. महाभारतांतहि विश्वामित्राची कथा आहेच. मात्र दोन्ही कथांत थोडाफार फरक आहे.

विश्वामित्राने वसिष्ठांच्या कामधेनूची मागणी केल्यामुळे त्या दोघांचा संघर्ष झाला. विश्वामित्राने कामधेनूचे जबरदस्तीने हरण करण्याचा प्रयत्न केला तेव्हां वसिष्ठांच्या सांगण्यावरून तिने स्वत:च सैन्य निर्माण करून स्वत:चे संरक्षण केले. विश्वामित्राच्या सर्व सैन्याचा संहार झाला. त्याचे शंभर पुत्र वसिष्ठाच्या क्रोधाला बळी पडले. उरलेल्या एका पुत्राला राज्य देऊन (विश्वामित्र मूळचा क्षत्रिय राजा) विश्वामित्र तपश्चर्येला गेला. अस्त्रे मिळवून त्याने पुन्हा वसिष्ठावर चाल केली. पण एका ब्रह्मदंडाच्या बळावर वसिष्ठाने त्याचा पुन्हा पराभव केला. तेव्हां ब्राह्मबळापुढे क्षात्रबळाचा निभाव लागत नाही म्हणून क्षत्रियबळाचा धि:क्कार करून विश्वामित्र ब्रह्मर्षिपद मिळवण्याच्या प्रयत्नाला लागला. त्याच्या तप:चर्येला पहिला अडथळा आला तो त्रिशंकूने सदेह स्वर्गाला जाण्यासाठी त्यांची मदत मागितली याचा. वसिष्ठपुत्रांनी त्रिशंकूला मदत नाकारल्यामुळे ईर्षेला बळी पडून विश्वामित्राने आपले तपोबल त्रिशंकूसाठी पणाला लावले. इंद्राने त्रिशंकूला सदेह स्वर्गात प्रवेश नाकारला व स्वर्गातून ढकलून दिल्यामुळे खाली डोके-वर पाय अशा अवस्थेत तो पृथ्वीवर पडू लागला. त्याला आकाशातच लटकत ठेवून त्याच्यासाठी विश्वामित्राने प्रतिसृष्टि

निर्माण केली. (प्रतिसृष्टि हे काय प्रकरण आहे याबद्दल पुढील भागात विस्ताराने लिहिणार आहे.) या सर्व खटाटोपात पुण्यक्षय झाल्यामुळे विश्वामित्र पुष्करतीर्थामध्ये पुन्हा तपश्चर्येला बसले. त्या काळी मेनका ही अप्सरा पुष्करतीर्थात स्नानाला आली. ती स्वत:हूनच आली होती. तिला इंद्राने विश्वामित्राचा तपोभंग करण्यासाठी पाठवले होते असे रामायण म्हणत नाही! मात्र तिच्या मोहात विश्वामित्र पडला हे खरे. एकूण दहा वर्षांचा काळ त्यांनी एकत्र घालवला. हा क्षणिक मोह नक्कीच नव्हता!. रामायणात येथे शकुंतलेचा मात्र अजिबात उल्लेख नाही! दहा वर्षांनी विश्वामित्र भानावर आले. त्यांनी मेनकेला मधुर शब्दात निरोप दिला व पुन्हा तपाला आरंभ केला. यावेळी प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने येऊन कौतुक केले पण ब्रह्मर्षिपद मान्य केले नाही. कारण विश्वामित्र अजूनहि जितेंद्रिय झालेले नव्हते. पुन्हा घोर तपश्चर्या चालू राहिली. यावेळी तपोभंगासाठी इंद्राने रंभेला पाठवले. तिच्या दर्शनाने काम व क्रोध दोन्हीहि जागृत झाल्यामुळे निराश होऊन विश्वामित्राने तिला शाप दिला व पुन्हा खडतर तप चालू केले. यावेळी मात्र त्यांनी सर्व विकारांवर विजय मिळवला व आपले ब्रह्मर्षिपद खुद्द वसिष्ठांकडूनच मान्य करवून घेतले. त्यांचे वैर संपून मैत्री झाली. खडतर प्रयत्नानी स्वत:च्या मनोवृत्तींवर विजय मिळवतां येतो हे त्यानी दाखवून दिले. रामायणातील विश्वामित्रकथा ही अशी आहे. महाभारतापेक्षां ही जास्त विस्तृत आहे व रंजकही आहे.

या कथेमध्ये विश्वामित्राने त्रिशंकूसाठी प्रतिसृष्टि निर्माण केली असे म्हटले आहे. बऱ्याच विचारांती हे एक रूपक आहे असे माझे मत बनले आहे. त्याचा मला सुचलेला खुलासा खालीलप्रमाणे आहे. आकाशात उत्तरध्रुव व तेथून आकाशीय विषुववृत्तापर्यंतच्या आकाशाच्या भागामध्ये अनेक तारकापुंज आहेत. आकाशीय विषुववृत्ताच्या (Celestial Equator) जवळच्या लहानशा पट्ट्यातून सूर्य, चंद्र व इतर बहुतेक ग्रह फिरतात. त्यांच्या भ्रमणमार्गाच्या या पट्ट्यात जे सत्तावीस तारकापुंज येतात त्याना नक्षत्रे म्हणतात. ही सर्व भारतात आपणाला दिसतात. भारतात येण्यापूर्वी आर्यलोक आणखी उत्तरेला उत्तरध्रुवाजवळच्या भागात राहात असावेत असे लोकमान्य टिळकांचे प्रतिपादन होते. भारतात आल्यावरही विश्वामित्राच्या काळापर्यंत त्यांचे वसतिस्थान अद्याप मुख्यत्वे उत्तरभारतातच होते. हा भूभाग पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या (terrestrial equator) बराच उत्तरेला २५ ते ३० अक्षांशांदरम्यान आहे. उत्तरध्रुवावरून आकाशाचा फक्त अर्धा भाग, आकाशाच्या उत्तर गोलार्धाचा, आकाशीय विषुववृत्ताच्या उत्तरेचा, दिसतो. उरलेला आकाशाचा भाग त्या भागातून आर्यांना कधीच दिसत नव्हता. उत्तरभारतात आल्यावरही विश्वामित्राच्या काळापर्यंत हा दक्षिण ध्रुवापासून २५-३० अंशांपर्यंतचा आकाशाचा भाग

आर्य ऋषिमुनीना दिसत नव्हता. या न दिसणाऱ्या आकाशाच्या भागातहि अनेक तारकापुंज प्रत्यक्षात आहेतच. प्रत्यक्ष दक्षिण ध्रुवापाशी एखादा तारा नाही. मात्र जवळच सदर्न क्रॉस नावाचा तारा आहे. दक्षिण गोलार्धात समुद्रावर सफर करणाऱ्या जहाजांना त्याचा वेध घेऊन दक्षिण दिशा ठरवतां येते. विश्वामित्राने या अद्याप सर्रास न दिसलेल्या आकाशाच्या भागामध्येहि ध्रुव, इतर तारकापुंज, कदाचित दुसरे सप्तर्षि, वा नवीन नक्षत्रे असली पाहिजेत हे तर्काने जाणले असावे वा दक्षिण दिशेला प्रवास करत असताना भारताच्या दक्षिण टोकापाशी पोचून ( हा भाग विषुववृत्तापासऊन फक्त १० अंशांवर आहे.) हे पूर्वी न दिसलेले तारकापुंज प्रत्यक्ष पाहिले असावेत व त्यांना नवीन नक्षत्रे म्हटले असावे. यालाच' त्याने प्रतिसृष्टि निर्माण केली' असे म्हटले गेले असावे. रामायणात, प्रतिसृष्टि निर्माण केली याचे वर्णन 'दक्षिणमार्गासाठी नवीन सप्तर्षींची सृष्टि केली व नवीन नक्षत्रेहि निर्माण केली' असेच केले आहे. रामायणात, सर्ग ६०-श्लोक २४ ते ३२ मध्ये ऋषीमुनींनी व देवांनी विश्वामित्राने निर्माण केलेली प्रतिसृष्टि मान्य केली व 'तुम्ही निर्माण केलेली सर्व नक्षत्रे वैश्वानरपथातून बाहेर प्रकाशित होतील व त्यांत त्रिशंकूहि प्रकाशमान होईल' असा त्यांना वर दिला असे म्हटले आहे. याचा अर्थ विश्वामित्राचे संशोधन व/वा तर्क ऋषिमुनीनी मान्य केला असा केला पाहिजे. मूळची सत्तावीस नक्षत्रे सूर्याच्या भ्रमणमार्गावर म्हणजे वैश्वानरपथावर आहेत व नवीन नक्षत्रे त्याचे बाहेर, आणखी दक्षिणेला आहेत, हे बरोबर जुळते. रामायणातच असलेल्या या सर्व वर्णनावरून प्रतिसृष्टि निर्माण केली म्हणजे काय याबद्दलचा हा खुलासा मला सुचला आहे. आकाशाच्या या दक्षिणध्रुवाजवळपासच्या भागात एखाद्या तारकापुंजात 'खालीं डोके-वर पाय' अशा अवस्थेत लोंबकाळणाऱ्या माणसासारखा दिसणारा एखादा तारकासमूह आहे काय? असल्यास तोच त्रिशकु! हा तर्क तपासून पाहणे मात्र माझ्या कुवतीबाहेरचे आहे. जो तर्क वा खुलासा वाचलेल्या मजकुरांतून सुचला तो आपणापुढे ठेवला आहे!

आता धनुर्भंगाची कथा पाहूं.

दुसऱ्या दिवशी जनकाने पुन्हा विश्वामित्र, राम व लक्ष्मण यांचे दरबारात स्वागत केले. विश्वामित्राने म्हटले कीं या दोघाना तुझे प्रख्यात धनुष्य पहावयाचे आहे. जनकाने धनुष्याचा इतिहास सांगितला कीं हें प्रत्यक्ष शिवाचे धनुष्य आहे व तें माझे पूर्वज देवरात यांना ठेव म्हणून देवांनी दिले तेव्हांपासून ते आमचेपाशी आहे. येथे फक्त एका

वाक्यात, यज्ञासाठी भूमिशोधन करताना नांगराने उकरल्या जात असलेल्या जमिनीतून कन्या प्रगत झाली ती सीता, एवढाच सीतेच्या जन्माचा इतिहास जनकाने सांगितला आहे. प्रत्यक्षात, एक तर सीता ही जनकाचीच शेतकरी स्त्रीपासून झालेली कन्या असावी वा शेतांत कोणीतरी ठेवून दिलेली नवजात कन्या जनकाने स्वत:ची कन्या म्हणून वाढवली असावी यांपैकी एखादा तर्क स्वीकारावा लागतो. जनकाला त्या वेळेपर्यंत अपत्य नव्हते. जनकाला पुत्र असल्याचा कोठेच उल्लेख नाही. उर्मिला ही पण जनकाची कन्या खरी पण ती सीतेपेक्षां लहान असली पाहिजे कारण ती लक्ष्मणाची पत्नी झाली. यामुळे जनकाने सीतेला अपत्यस्नेहापोटी स्वत:ची कन्या मानणे योग्य वाटते. रामायणाचे अनेक पाठभेद जगभर अनेक भाषांतून प्रचलित आहेत. त्यांतल्या एकांत ती रावणाची कन्या होती असाही तर्क केलेला आहे असे वाचलेले आठवते. अशा भरमसाठ तर्कापेक्षा मी वर व्यक्त केलेला तर्क कदाचित जास्त उचित म्हणतां येईल.

जनक पुढे म्हणाला कीं जो आपल्या पराक्रमाने हे शिवधनुष्य सज्ज करील त्यालाच ही माझी कन्या द्यावयाची असा माझा निश्चय आहे. पूर्वी एकदा सीतेच्या प्राप्तीसाठी सर्व राजे एकत्र जमून माझ्याकडे आले व कोणता पण लावला आहे असे त्यानी मला विचारले तेव्हा हाच पण मी त्यांना सांगितला. कोणालाही हे धनुष्य उचलता आले नाही. अपयशामुळे रागावून त्या सर्वांनी माझ्याविरुद्ध युद्ध पुकारले व एक वर्षभर त्यांनी मिथिलेला वेढा घातला. शेवटीं मी देवांची प्रार्थना केली व त्यांनी प्रसन्न होऊन मला चतुरंग सेना दिली व मग मी सर्व राजांना हरवून पिटाळून लावले. ( सीतेच्या प्राप्तीसाठी रावणानेही शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला होता व त्यांत तो धनुष्य उरावर घेऊन उताणा पडला अशी एक हरदासी कथा आहे मात्र तिला रामायणात कोणताही आधार नाही!) आता रामाने हे धनुष्य सज्ज केले तर मी ही माझी कन्या त्याला देईन असे जनक अखेरीस म्हणाला. ( राम यावेळी जेमतेम सोळा वर्षांचा होता. सीता फारतर १३-१४ वर्षांची असेल. तेव्हां यापूर्वीच काही काळ अनेक राजांनी तिच्या प्राप्तीसाठी शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला हे जरासे अविश्वसनीयच वाटते!)

या सर्व प्रसंगात सीता अजिबात उपस्थित नाही. तिने रामाला अद्याप पाहिलेलेहि नाही. स्वयंवर वगैरे काही समारंभ योजलेलाच नव्हता. विश्वामित्र व राम-लक्ष्मण अचानक व अनाहूतच आलेले होते. मग 'लाजली सीता स्वयंवराला पाहुनी रघुनंदन सावळा' कोठून आले? हे गाणे लिहिणाराने सीता व द्रौपदी या दोघींच्यात मोठी गफलत केलेली दिसते!

धनुष्य राजा जनक विश्वामित्र राम व लक्ष्मण यांचेसमोर आले. संदूक उघडून रामाने ते सहजच उचलले व त्याला प्रत्यंचा लावली. त्यावर बाण न ठेवतांच त्याने ते खेचले तो तें तुटलेच.! धनुष्य कां तुटले असेल? यापूर्वी वेळोवेळी युद्धात ते त्याच्या अंतिम मर्यादेपर्यंत अनेकवार खेचले गेले असणार त्यामुळे त्याचे engineering शास्त्राप्रमाणे 'work hardening' झाले असेल. त्यामुळे रामाने ते झटक्याने खेचले तेव्हा ते तुटले. रामाने धनुष्य सज्ज केले त्यामुळे जनकाने प्रतिज्ञेप्रमाणे सीता रामाला अर्पण केल्याचे जाहीर केले. विश्वामित्राच्या संमतीने लगेच जनकाने आपले मंत्री दशरथाकडे पाठवून, सर्व हकीगत कळवून विवाहासाठी सर्वांनी येण्याचे आमंत्रण केले. एवढेच सीता स्वयंवर! प्रत्यक्षात सीतेला कोणी कांही विचारलेच नाही! तेव्हा या प्रकाराला स्वयंवर कां म्हणावे हा प्रश्नच आहे!

बालकांडाच्या अखेरच्या भागांत राम व त्याचे बंधु यांच्या विवाहाची तपशीलवार हकीगत सांगितली आहे. जनकाच्या निमंत्रणाप्रमाणे दशरथ सर्व कुटुंबियांसमवेत मिथिलेला आला. वसिष्ठ व जनकाचा पुरोहित यांनी एकमेकांच्या कुळांचा इतिहास व महिमा एकमेकांस सांगितला. जनकाने आपली दुसरी कन्या लक्ष्मणाला दिली व भावाच्या दोन कन्या भरत शत्रुघ्नांना दिल्या. राम व त्याचे बंधु यावेळी सोळा वर्षांचे होते. सीता रामाला अनुरूप वयाची असे धरले तर ती १२-१३ वर्षांची व इतर बहिणी बहुधा त्याहून लहान म्हणजे बालिकाच होत्या. सीतेच्या प्राप्तीसाठी मागणी करणाऱ्या व नाकारल्यामुळे युद्धाला उभे राहिलेल्या सुधन्वा नावाच्या राजाची कथा येथे येते. त्याचा पराभव करून व त्याला मारून त्याचे राज्य जनकाने आपल्या भावाला दिले. किती वर्षांपूर्वीची ही घटना ते सांगितलेले नाही. फार पूर्वीची असणे शक्यच नाही कारण सीतेचे वय यावेळी १२-१३च होते.

चारही भावांचे विवाह पार पडले. दशरथाबरोबर कैकयराजाचा पुत्र युधाजित, भरताचा मामा, उपस्थित होता. भरताला आजोबांच्या भेटीला नेण्यासाठी तो अयोध्येला आलेला होता. तो विवाहासाठी मिथिलेला आला. कौसल्या-सुमित्रा यांच्या कुळांपैकी कोणी आल्याचा उल्लेख नाही. कौसल्या नावावरून कोसल देशाची राजकन्या असावी. तिला माहेराहून संपत्ति, गावे, मिळालेली होतीं असा पुढे उल्लेख मिळतो. सुमित्रा गरीब, नगण्य घराण्यातील असावी. जनकाने हुंडा म्हणून अमाप धन, गायी, वस्त्रे, हत्ती, घोडे, रथ व सैनिकही दिले. दासदासी, रत्नेहि दिली. सीतेबरोबर १०० मैत्रिणीहि दिल्या!

देवयानीबरोबर आलेली तिची मैत्रिण शर्मिष्ठा अखेर ययातीकडे पोचली, तसे रामाचे बाबतीत झाले नाही! विवाहसमारंभ आटपल्यावर विश्वामित्र आपल्या वाटेने गेले व दशरथही पुत्र, सुना, सैनिक, सेवकांसह अयोध्येला निघाले. मात्र वाटेत त्याना परशुराम आडवे आले.

त्यानी पूर्वी केलेला क्षत्रिय संहार आठवून दशरथ भयभीत झाला. परशुरामाने शिवधनुष्य तुटणे ही अद्भुत व अचिंत्य अशी घटना आहे असे म्हणून स्वत:चे धनुष्य



रामासमोर धरले व म्हटले की 'हे सज्ज करून दाखव व तसे करू शकलास तर माझ्याशी द्वंद्वयुद्ध कर'. दशरथाने गयावया करून 'तुम्ही इंद्राजवळ प्रतिज्ञा करून शस्त्रांचा परित्याग केलेला आहे' याचे स्मरण दिले. परशुरामाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले! त्याने रामाला पुन्हा म्हटले की विश्वकर्म्याने बनवलेल्या दोन खास धनुष्यांपैकी एक शिवाने त्रिपुरासुराशी युद्ध करताना वापरले व हे दुसरे विष्णूपाशी होते. पूर्वी एकेकाळी शिव व विष्णू ही धनुष्ये घेऊन युद्धाला सज्ज झाले होते. देवांनी त्यांना शांत केले. शिवाचे धनुष्य शिथिल अवस्थेत जनकाच्या पूर्वजांकडे ठेव म्हणून दिले गेले व विष्णूचे हे धनुष्य भृगुवंशीय ऋचीक, नंतर माझा पिता जमदग्नि व नंतर माझ्याकडे आले. शिवधनुष्य तुटल्याचे ऐकून मी हे त्याच्या तोडीचे विष्णु धनुष्य घेऊन आलो आहे तर तू हे सज्ज करून दाखव व मग माझ्याशी द्वंद्व युद्ध कर.' रामाने धनुष्य सज्ज केले, बाण लावला व म्हटले की 'मी हा बाण तुमच्यावर सोडत नाही पण या वैष्णव बाणाने तुमचे सर्व तपोबल किंवा तुमची द्रुतसंचारशक्ति यांतील एक काहीतरी नष्ट होईल' परशुराम म्हणाला कीं 'मी सर्व पृथ्वी कश्यपाला दान केली व त्याने रात्री कोठेहि निवास करण्याची मला बंदी केली आहे त्यामुळे मला रात्रीपूर्वी महेंद्रपर्वतावर

पोंचण्यासाठी द्रुतसंचार शक्तीची गरज आहे तेव्हां ती राहूं दे.' रामाने त्याचे सर्व तपोबल नष्ट केले. राम हाच आपल्यानंतरचा विष्णूचा अवतार आहे हे जाणून परशुराम तपश्चर्येला निघून गेला. महेंद्रपर्वत कश्यपाला पृथ्वी दान केल्यावर परशुरामाने निर्माण केलेल्या ( वसतीखाली आणलेल्या) नवीन प्रदेशामध्ये होता काय? परशुराम यानंतर रामकथेत कोठेहि नाही, तो थेट महाभारतात पुन्हा अवतरतो. भीष्म व कर्ण हे त्याचे शिष्य त्या कथेत महत्वाचे आहेत. रामायणातील या प्रसंगामध्ये परशुरामाला एवढा कमीपणा देण्याचे काय कारण? राममाहात्म्य वाढवणे एवढेच. असे दिसते की क्षत्रियांमध्ये बलवान व्यक्ति पुन्हा जन्माला आल्या आहेत व झाला एवढा क्षत्रियसंहार पुरे हे परशुरामाला मान्य करावे लागले एवढाच मथितार्थ खरा.

विष्णुधनुष्य नंतर वरुणाला देऊन राम व दशरथ अयोध्येला गेले. लगेचच भरत व बरोबर शत्रुघ्नहि युधाजिताबरोबर कैकयदेशाला गेले. त्यांच्या पत्नी त्यांचेबरोबर गेल्याचा उल्लेख नाही. त्या अल्पवयीन असाव्या. भरत-शत्रुघ्न दीर्घकाळ कैकयदेशाला राहिले असे दिसते कारण रामाला राज्य देण्याचा बेत पुढे आला तोवरही ते परत आलेले नव्हते. मध्यंतरी किती काळ गेला? त्याचा उल्लेख रामायणात तेथे स्पष्ट नाही. त्याबद्दल पुढे विस्ताराने लिहीन.

बालकांड हा रामायणाचा भाग नाही असेहि मत आहे. खरे-खोटे ठरविणे माझे काम नाही. जसे आहे तसे समोर ठेवून मी त्याचा परामर्ष घेतला आहे.

# अयोध्याकांड

बालकांडाचे अखेरीस, राम, त्याचे बंधू, त्यांच्या नवीन वधू व सर्व कुटूंब अयोध्येला परत आले व लगेचच भरत व शत्रुघ्न केकय देशाला गेले असे म्हटले आहे. अयोध्याकाडाचा कथाभाग येथून पुढे सुरू होतो. मध्यंतरी किती काळ गेला याचा स्पष्ट उल्लेख रामायणात नाही. ७-८ वर्षे तरी गेलीं असावीं असा तर्क करावा लागतो. या तर्काला आधार, पुढे एका ठिकाणी कौसल्येच्या तोंडी आलेला एक उल्लेख व नंतर अरण्यकांडात सीताहरण प्रसंगी रावण व सीता यांच्यातील संवाद हे आहेत. त्याबद्दल त्या त्या प्रसंगी पुन्हा खुलासा करणार आहे. भरत-शत्रुघ्न केकय देशाहून दीर्घकाळ परत आले नाहीत. स्पष्ट उल्लेख नसला तरी केव्हातरी त्यांच्या बायकांचीहि रवानगी तिकडे झाली असावी. हे दोघे केकय देशाला एवढा दीर्घकाळ कां राहिले असावे याचे काहीहि कारण रामायणात मिळत नाही.

राज्यकारभार संभाळण्याचा कंटाळा येऊन, आपण जिवंत असतानाच राम सत्तेवर यावा असे दशरथाला वाटू लागले व त्याने मंत्र्यांबरोबर सल्लामसलत करून रामाला युवराज बनवण्याचा निश्चय केला. वेगवेगळया देशांतील पुरुष व राजे यांना विचारविनिमयासाठी आमंत्रित केले. मात्र, 'घाईमुळे' राजा जनकाला व केकयराजाला बोलावले नाहीं. अशी कोणती घाई होती बरें? कैकय्रराज्य बहुधा दूर असावे पण जनक तर जवळच होता. मग दोघांना कां टाळले? हें एक शंकास्थळ आहे. योजलेल्या बेतात विघ्न येण्याची तर दशरथाला शंका नव्हती ना? कोणाकडून विघ्न येणार होते?

दशरथाने भरवलेल्या सभेत आपला विचार बोलून दाखवला. 'मी उद्याच रामाला युवराजपदावर नियुक्त करूं इच्छितों' असे म्हटले. या विचाराला संमति न देण्यासारखे काही कारणच नसल्यामुळे सर्वांनी संमति दिली. दशरथाने लगेच रामाला बोलावून घेऊन त्याला सांगितले कीं 'हा चैत्र महिना आहे, उद्याच पुष्य नक्षत्रावर युवराजपद ग्रहण कर'. तिथीचा उल्लेख त्याने केलेला नाही. कौसल्येलाही हा बेत कळवण्यात आला. दशरथाने पुन्हा रामाला बोलावून व एकांतात भेटून म्हटले कीं 'नक्षत्रे, ग्रह मला प्रतिकूल आहेत व माझ्या मृत्यूची शक्यता आहे. मला मोह होत नाही तोवरच तुला

अभिषेक करून घे कारण मनुष्याची बुद्धि चंचल असते.' पुन्हा आणखी असेहि म्हटले कीं 'जोवर भरत नगराबाहेर मामाकडे आहे तोवरच तुझा अभिषेक होणे मला उचित वाटते. भरत सत्पुरुष आहे पण माणसाचे मन नेहमीच स्थिर असत नाही.' यावर रामानेहि दशरथाला खोडून काढून भरतावर दृढ विश्वास व्यक्त केला नाही! असा संशय येतो कीं दोघांच्याही मनात भरताबद्दल वा ठरवलेल्या बेताबद्दल काही आशंका असावी.

बेत कळल्यावर साहजिकच कौसल्या, सुमित्रा व खुद्द राम यांच्या महालात आनंदाचे वातावरण पसरले. दशरथाच्या आज्ञेवरून वसिष्ठ रामाकडे येऊन त्याने रामाला व्रतस्थ राहण्यास सांगितले. जनतेतहि बातमी पसरून शहरात आनंदोत्सव सुरू झाला. कैकेयीला याबद्दल कोणीच कळवलेले नव्हते. शहरातल्या आनंदोत्सवावरून प्रथम मंथरेला अभिषेकाचा बेत कळला व ती उद्विग्न झाली. मंथरा कोण होती? ती कैकेयीची माहेराहून आलेली, वयाने मोठी असलेली, खास दासी होती. तिने साहजिकच कित्येक वर्षे अयोध्येत काढली होतीं. कैकेयीची ती अयोध्येतील (खुद्द दशरथ सोडून) एकुलती एक हितचिंतक होती. ती कुरूप होती असे अतिशयोक्त वर्णन केलेले आहे. पण ती मूर्ख किंवा दुष्ट खासच नव्हती! बातमी कळल्यावर ती उद्विग्न व क्रुद्ध झाली. येणाऱ्या संकटाची यथोचित जाणीव तिने लगेचच कैकेयीला करून दिली. कैकेयी व मंथरा यांच्या संवादावरून दोघींच्याही स्वभावावर प्रकाश पडतो व आपल्या मनातल्या ठाम समजुतींना धक्का बसतो.

रामाच्या अभिषेकाची बातमी मंथरेकडून कळल्यावर कैकेयीला प्रथम आनंदच वाटला. त्याअर्थी ती बहुधा भोळी-भाबडी असावी. मात्र मंथरेने तिला फटकारून समजावले कीं 'तूं राणी असून तुला राजधर्मातील उग्रता समजत कशी नाही? तुझा पति समाधानासाठी तुझ्याकडे येतो पण आता कौसल्येचे हित करतो आहे. तुला कळत कसे नाही? सवतीचा पुत्र हा शत्रू असतो. भरत व राम यांचा राज्यावर सारखाच अधिकार आहे त्यामुळे रामाला भरतापासूनच भय आहे. लक्ष्मण रामभक्त तर शत्रुघ्न शेवटचा त्यामुळे त्याचा राज्यावर मुळीच अधिकार नाही. उत्पत्तिक्रमाने रामापाठोपाठ भरताचाच राज्यावर अधिकार आहे तेव्हा रामाला त्याचेच भय वाटणार आणि त्यामुळे तो तुझ्या पुत्राला क्रूरतापूर्वक वागवील. भरताला त्याची गुलामी करावी लागेल.'

कैकेयीला हे ऐकूनहि धोका कळला नाही व ती पुन्हा भाबडेपणाने मंथरेला म्हणाली 'रामानंतर १०० वर्षांनी कां होईना, भरत राजा होईलच. तूं कशाला संतापतेस? मला भरताइतकाच रामहि प्रिय आहे. रामाला राज्य मिळणार म्हणजे भरतालाच

मिळाल्यासारखे मला वाटते!' मंथरेने तिला पुन्हा समजाविले कीं 'मूर्खे, रामानंतर त्याचा पुत्रच राजा होईल आणि भरत कायमचाच बाजूला पडेल. तुला काहीच कसे कळत नाही? रामाला राज्य मिळाले तर तो भरताला बाहेरच घालवील! भरताला तू दीर्घकाळ आजोळी राहूं दिलेस त्यामुळे त्याचे नुकसान होणार आहे. तो येथेच असता तर राजाला त्याचेहि रामासारखेच प्रेम वाटले असते व त्याला अर्धे राज्य तरी मिळाले असते. शत्रुघ्नहि येथे नाही मग भरताचे हितरक्षण तुझ्याशिवाय कोण करणार? राम लक्ष्मणावर प्रेम करतो पण भरताचा तो तिरस्कार आणि द्वेष करील. तुं भरताच्या हिताचे रक्षण केले पाहिजे. ज्या कौसल्येचा तूं अनादर करतेस ती राम राजा झाला तर तुझा सूड घेईल.'

या संवादावरून दोघीच्या स्वभावावर प्रकाश पडतो व आपल्या पूर्वग्रहांना धक्का बसल्याशिवाय राहणार नाहीं. कैकेयी भोळी दिसते तर मंथराही 'अकारण' रामाचा द्वेष करणारी नसून कैकेयी-भरताचें हितरक्षण हे आपले कर्तव्य आहे या भावनेतून तिला जाणवणारा धोका तिने कैकेयीला स्पष्टपणे दाखवून दिला आहे. राजवाड्यातील राजकारणात तिची बाजू कोणती याबाबत तिला संदेह नाही!

आता कैकेयीचे मन पालटले. दशरथाने, पूर्वी एका युद्धप्रसंगात कैकेयीने कौशल्याने व धैर्याने त्याचे सारथ्य करून त्याचा जीव वाचवला तेव्हां तिला वर दिले होते व ते कैकेयीने लगेच न मागतां राखून ठेवले होते. त्या वरांची मंथरेनेच कैकेयीला आठवण करून दिली व 'त्या वरांचा वापर करून, भरताला राज्य व रामाला चौदा वर्षे वनवास मागून घे व भरताला निष्कंटक राज्य मिळवून दे' असे सुचवले. 'चौदा वर्षांच्या काळात भरत जनतेचे प्रेम मिळवून स्थिर होईल व रामाचा सध्याचा प्रभाव राहणार नाही' असा दूरदृष्टीचा व रास्त सल्ला तिला दिला. दुर्योधनाने पांडवांना वनवासाला धाडताना हाच हेतु बाळगला होता याची आठवण सहजच होते. सल्ला पटला व कैकेयीचा बेत पक्का झाला. मंथरेची तिने स्तुति केली.

पुढे एका ठिकाणी उल्लेख आहे कीं दशरथाने कैकेयीशी विवाह करताना तिच्या पित्याला वचन दिले होते कीं तिच्या पुत्राला राज्य मिळेल. तोंपर्यंत कौसल्या-सुमित्रेला पुत्र नसल्यामुळे दशरथाने तसे वचन दिले होते. (महाभारतात, सत्यवतीच्या बापाने असे वचन शंतनूपाशी मागितले पण ते शंतनु देऊ शकत नव्हता कारण पुत्र देवव्रत भीष्म वयात आला होता, त्याला कसे डावलणार?) या वचनाची मंथरा वा कैकेयी

दोघींनाहि माहिती नसावी कारण याप्रसंगी तसा काही उल्लेख नाही. भरताला राज्य देण्याचे वचन खरे तर जुनेच होते आणि वरांचा वापर करण्याची गरजच नव्हती. पण दशरथानेच आपले वचन पाळले नव्हते! ( रघुकुलकी रीत, जान जाय परि वचन न जाय हे खरे ठरले नव्हते!)

कैकेयीने भरताला राज्य व रामाला वनवास मागण्याचे ठरवले. इकडे अभिषेकाची तयारी करण्यास सांगून दिवस संपल्यामुळे दशरथ नेहेमीप्रमाणे कैकेयीच्या महालीं आला. रामायण म्हणते कीं राजा म्हातारा असल्यामुळे त्याला तरुण कैकेयी फार प्रिय होती! कैकेयी बेताप्रमाणे रुसून बसलेली होती. तिची समजूत काढण्यासाठी 'काय हवे ते माग' असे दशरथ म्हणाला. पूर्वी दिलेल्या वरांची आठवण देऊन कैकेयीने भरताला राज्य व रामाला १४ वर्षे वनवास, व तोही ताबडतोब, अशा मागण्या केल्या. भरताला राज्य देण्याचे दशरथाने ताबडतोब व बेलाशक मान्य केले! कैकेयीच्या पित्याला दिलेले वचन त्याच्या स्मरणात असणारच! तेव्हां ठरवल्या बेताप्रमाणे ते डावलता येत नाही असे दिसल्यावर त्याने रामाला बाजूस सारण्याचे लगेच मान्य केले. मात्र रामाबद्दल कोणतीही तक्रार नसताना वा त्याचा काही अपराध नसताना त्याला वनवासाला पाठवणे त्याने मान्य केले नाही. त्याने अनेक युक्तिवाद केले, कैकेयीच्या विनवण्या केल्या पण कैकेयीला मंथरेने दाखवून दिलेला धोका पक्का पटला होता. ती ठाम राहिली. दशरथाचे युक्तिवाद असे –

१. रामाशिवाय भरत राज्य स्वीकारणारच नाही.

२. जमलेल्या राजे लोकांना, मंत्र्यांना, जनतेला कसे सांगूं कीं कैकेयीच्या दबावामुळे मी रामाला वनवासाला पाठवतो आहे?

३. कौसल्या, सुमित्रा, सीता सर्व दु:खित होतील. मी जिवंत राहणार नाही.

४. तुला वरताना मला कळले नाहीं कीं तूंच माझ्या मृत्यूला कारण होशील.

५. रामाने वनवासाला जाण्याची आज्ञा मानली नाही तर मला आनंदच होईल पण तसे होणार नाही.

६. रामाला राज्य देण्याची घोषणा मी भर राज्यसभेत केली आहे ती कशी मोडूं?

कैकेयीने फक्त येवढेच म्हटले कीं 'तुम्ही मोठे सत्यवादी व दृढप्रतिज्ञ म्हणवता मग मी मागत असलेले वर कां देत नाही?' रामाला वनवासाला पाठवण्याचे कारण कैकेयीने सांगितले नाही पण दशरथानेहि विचारले नाही! त्याला ते कळलेच असणार. त्याबद्दल कैकेयीचे शंकानिरसन करण्याचा प्रयत्नहि दशरथाने केला नाही. दशरथ काकुळतीला येऊन 'मी तुझे पाय धरतों' असेहि म्हणाला पण अखेर कैकेयीने म्हटले कीं 'सत्याचे अनुकरण करा. मी माझे मागणे त्रिवार मागत आहे आणि ते मानले नाही तर मी प्राणत्याग करीन' बोलणेच खुंटल्यामुळे दशरथाने अखेर त्राग्याने म्हटले कीं 'विवाहाचे वेळी धरलेला तुझा हात मी सोडून देतो आहे. तूं माझी कोणी नव्हेस. तूं वा भरत मला तिलांजलिही देऊं नका!'

दशरथ येवढ्या टोकाला जाऊन कठोर बोलल्यावरही कैकेयीने आपली मागणी सोडली नाही.

सर्व रात्र कैकेयीच्या विनवण्या करण्यात गेली पण कैकेयीने आपल्या मागण्या मागे घेतल्या नाहीत. संपूर्ण नाइलाज झाल्यामुळे रात्र संपल्यावर दशरथाने रामाला बोलावण्याचे ठरवले. सुमंत्र आल्यावर कैकेयीनेच त्याला पाठवून रामाला बोलावून घेतले. तो आल्यावर दशरथाला काहीच बोलवेना तेव्हां कैकेयीनेच रामाला सांगितले कीं 'ते तुला स्वत: सांगणार नाहीत पण तू ताबडतोब १४ वर्षांसाठी वनात जायचे आहेस व राज्य भरताला मिळायचे आहे.' रामाने ताबडतोब मान्य केले व म्हटले 'मी तुझ्या आज्ञेनेच सर्वस्व त्यागीन मग राजाला कशाला त्रास दिलास?' कैकेयीने त्यावर म्हटले कीं 'तूं खुषीने राज्य सोडून वनात गेल्याशिवाय महाराज स्नान वा भोजन करणार नाहीत.'

यापुढील प्रसंग आपणाला परिचित आहेत. सीता व लक्ष्मण रामाबरोबर वनात जाण्याचा आग्रह धरतात व राम तें मान्य करतो. कौसल्या व सुमित्रा विलाप करतात. उर्मिळेचा अजिबात उल्लेख कोठेच नाही! कौसल्येच्या तोंडी येथे एक उल्लेख येतो 'रामा तुझे उपनयन होऊन सतरा वर्षे झालीं' यावरून यावेळी रामाचे वय २५ वर्षे व सीतेचे २०-२१ वाटते. उर्मिळा बहुधा सीतेपेक्षा थोडी लहान असावी तरी १८-१९ वर्षांची असणार, म्हणजे अजाण नव्हे. मात्र लक्ष्मणासकट कोणीच तिला काही महत्व दिले नाही. सासवांची सेवा

करण्यासाठी तिला मागेच ठेवले! भरत-शत्रुघ्नांच्या बायका यावेळी नवऱ्यांबरोबर कैकय देशालाच असणार.

सुमंत्राने कैकेयीला समजावले कीं 'भरत राजा झाला तर आम्ही सर्व रामाकडे वनात जाऊं' कैकेयीवर परिणाम शून्य. (सुमंत्र खरेतर राजाचा व राज्याचा सेवक, त्याला नवीन राजा भरत याची सेवा करणे हेच उचित!) दशरथाने सुमंत्राला म्हटले 'रामाबरोबर मोठी सेना व धनवैभव पाठवा.' कैकेयीने ठाम विरोध केला. सुने सुने वैभवहीन राज्य तिला भरतासाठी नको होते. तिने आग्रह धरला कीं 'पूर्वी इक्ष्वाकु घराण्यातील असमंज नावाच्या राजपुत्राला दुर्गुणी निघाल्यामुळे राज्याबाहेर घालवून दिले होते तसे रामाला घालवा.'

'ही तुझी मूळची अट नव्हती' असे दशरथ म्हणाला पण कैकेयीने तेहि मानले नाही. तिने राम व असमंज यांना एकाच पायरीला बसवले याचा वसिष्ठासकट सर्वांनाच फार राग आला. सीतेने वल्कले नेसण्याची वेळ आली तेव्हा मात्र वसिष्ठाने व दशरथाने ठाम विरोध केला. दशरथ म्हणाला कीं 'सीता माझ्या आज्ञेमुळे नव्हे तर स्वखुषीने वनात जाते आहे. तेव्हां ती सर्व वस्त्रालंकारांसकटच वनात जाईल'. (सीतेला रामाने वल्कले नेसावयास शिकविले अशी एक थाप आपले हरदास-पुराणिक मारतात, त्यांत तथ्य नाहीं!) लक्ष्मणाने वल्कले नेसल्याचा उल्लेख नाही. आपल्या आईला संभाळण्याची पित्याला विनंति करून राम वनांत जाण्यास निघाला. दशरथाने सुमंत्राला त्या तिघांना वनांत सोडून येण्यास सांगितले.

या सर्व प्रसंगांत, एकदां मंथरेचा सल्ला पटल्यावर, कैकेयीने दाखवलेला मनाचा खंबीरपणा लक्षणीय आहे.

सुमंत्र रथात राम-लक्ष्मण-सीता यांना घालून निघाला तो संध्याकाळी तमसातीरावर पोंचला. पाठोपाठ आलेल्या नगरवासीयांचा रामाला परत येण्याचा आग्रह चालूच होता. पहाटे रामाने सुमंत्राला एकट्याला रथ घेऊन उत्तर दिशेला पाठवले व काही वेळाने दुसऱ्या वाटेने परत येण्यास सांगितले. प्रजाजनांचा गैरसमज होऊन ते रथामागोमाग गेले व रथ परत आल्यावर त्यांत बसून राम, लक्ष्मण, सीता दक्षिण दिशेला वनाकडे निघाले. दुसऱ्या रात्रीपर्यंत रथ गंगातीराला पोंचला. गुहकाची भेट होऊन पुढील दिवशीं त्याने रामाला गंगापार केले. सुमंत्राची रथासह रामाबरोबर राहण्याची इच्छा होती पण 'तूं परत गेल्याशिवाय कैकेयीची खात्री पटणार नाही' असे समजावून रामाने त्याला गंगातीरावरूनच

परत पाठवले. आतां तिघेंच वनांत राहिलीं. या वेळी प्रथमच रामाने कैकेयीबद्दल कडवट शब्द उचारले व 'कैकेयी तुझ्या-माझ्या मातेला विषही देईल' अशी भीति लक्ष्मणापाशी व्यक्त केली. लक्ष्मणाने त्याला समजावले.

रामाने गंगा कोठे ओलांडली? गंगा ओलांडून तो गंगा-यमुनांच्या संगमाजवळ भरद्वाज मुनींच्या आश्रमात पोचला असे म्हटले आहे. तेव्हा हा आश्रम (प्रयाग) अलाहाबादजवळ संगमापाशी यमुनेच्या उत्तरेला असला पाहिजे कारण यमुना ओलांडलेली नव्हती. आश्रम संगमाजवळ असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. भरद्वाजांनी स्वागत करून येथेच रहा असे म्हटले पण हा प्रदेश अयोध्येच्या जवळच तेव्हां तें न मानतां भरद्वाजांच्याच सल्ल्याने तेथून दहा कोस अंतरावर चित्रकूट पर्वतावर जाण्याचे ठरले. दुसरे दिवशी भरद्वाजानी चित्रकूटाला जाण्याचा मार्ग समजावून सांगितला त्यांत यमुना ओलांडण्यास सांगितले. त्यावरून चित्रकूट यमुनेच्या दक्षिणेला पण जवळपासच होता असा समज होतो. येथपर्यंत रामाचा प्रवासमार्ग रामायणावरून बराचसा कळतो. यांनंतरचे प्रवासवर्णन भौगोलिक दृष्ट्या धूसरच आहे. यमुना ओलांडण्यासाठी सुकलेल्या बांबूंची नौका वा तराफा लक्ष्मणाने बनवला. त्या रात्री यमुनेच्या तीरावर राहून दुसऱ्या दिवशी चित्रकूटाला पोचले. तेथे वाल्मिकीचा आश्रम होता. त्याचे जवळच लक्ष्मणाने कुटी बनवली. येवढ्या प्रवासामध्ये ४-५ दिवस गेले. भरत येऊन भेटेपर्यंत राम येथेच राहिला. चित्रकूट प्रयागपासून जवळच असावा अशी समजूत होते. त्याबद्दल प्रत्यक्ष परिस्थिती पुढे पाहूं.

रामाने निरोप दिल्यावर सुमंत्र गुहकाजवळ, राम कदाचित बोलावील या आशेने काही दिवस थांबून राहिला होता. राम भरद्वाज आश्रमाला पोचल्याची बातमी गुहकाच्या हेरांनी सांगितल्यावर निराश होऊन तो अयोध्येला परत गेला. तो रामाशिवायच परत आलेला पाहून राम खरेच वनात गेला अशी खात्री होऊन दशरथ मूर्च्छित झाला. मग 'मला रामाकडे ने' असे सुमंत्राला विनवू लागला. राम वनात जाऊन पांच रात्री उलटल्या असे यावेळी कौसल्या म्हणाली यावरून सुमंत्र गुहकापाशी एखददुसराच दिवस राहिला असावा. दशरथ, कौसल्या शोकमग्न झालीं. दशरथाने यावेळी श्रावणाची कथा सांगून त्याच्या पित्याचा शाप मला भोवतो आहे असे म्हटले. मात्र श्रावणाचा जन्म वैश्य पिता व शूद्र माता यांचेपासून असल्याचे दशरथ म्हणाला. हा खुलासा मुद्दाम करण्याचे कारण दशरथाला ब्रह्महत्येचे पातक लागलेले नव्हते हे स्पष्ट करणे हेच असावे. त्यामुळे दशरथाचा गुन्हा थोडा सौम्य ठरला! विलाप करीतच मध्यरात्री दशरथ मरण पावला. हा प्रसंग कौसल्येच्या महालात घडला व सुमित्राही तेथेच होती पण कैकेयीचा उल्लेख नाही.

कौसल्या, सुमित्रा अर्धवट शुद्धीत होत्या त्याना दशरथ मेल्याचे कळलेहि नाही. जणू तो बेवारशासारखा मरण पावला! कैकेयीला काहीच कळले नव्हते. दुसरे दिवशी राण्या, मंत्री, वसिष्ठमुनि, प्रजाजन सर्व शोकमग्न झाले. एकहि पुत्र जवळ नसल्याने दशरथाचे शव तेलाने भरलेल्या द्रोणीत ठेवले. (आजकाल मॉर्गमध्ये ठेवतात तसे!). मार्कंडेय ऋषीनी वसिष्ठाना म्हटले की कोणाही राजवंशातील व्यक्तीला अभिषेक करा. तें न मानून वसिष्ठाने पांच दूत भरताकडे शीघ्र पाठवले.

अयोध्येहून निघालेले दूत ४-५ दिवसांत कैकय देशाच्या राजधानीला पोंचले. त्यांच्या प्रवासमार्गाचे विस्तृत वर्णन केलेले आहे. प्रथम मालिनी नदी व नंतर हस्तिनापुरापाशी गंगा ओलांडली, पांचाल व कुरुजांगल देश ओलांडला असे म्हटले आहे. यमुना ओलांडल्याचा उल्लेख नाही. यानंतर इतरहि नद्या, इक्षुमती व विपाशा ओलांडल्याचे वर्णन आहे व मग ते राजधानीला पोचले तिचे नाव गिरिव्रज असे दिले आहे. महाभारतातहि एक गिरिव्रज आहे. ती जरासंधाची राजधानी होती. डोंगरांनी वेष्टिलेली म्हणून तिचे नाव गिरिव्रज. पण महाभारतातील गिरिव्रज म्हणजे पाटणा अशी माझी समजूत आहे. तें हें नव्हे. गंगा सोडून इतर नद्यांचीं जुनी नावे परिचित नसल्याने हे केकय देशातील गिरिव्रज कोठे होते त्याचा नीट उलगडा होत नाही.

दूतांना आज्ञा होती कीं भरताला दशरथ मृत्यु पावल्याचें कळूं द्यावयाचे नाहीं, लगेच अयोध्येला बोलावले आहे एवढेच सांगावयाचे. निरोप मिळाल्यावर पितामहांची परवानगी घेऊन भरत लगेच मंत्र्यांसह अयोध्येस निघाला. त्याचेबरोबर अनेक भेटी, संपत्ति व सैन्य असल्यामुळे त्याला प्रवासाला वेळ लागला. शत्रुघ्न व या दोघांच्या बायका बरोबर होत्या काय? खुलासा नाही. मुळात त्या केकय देशाला गेल्याचाच कोठे उल्लेख नाही पण कित्येक वर्षे भरत आणि शत्रुघ्न केकय देशालाच होते तेव्हां सुरवातीला ते दोघे गेले तेव्हां त्या कदाचित वयाने लहान असल्याने गेल्या नसल्या तरी पुढे केव्हां तरी गेल्याच असणार. एकूण रामायणात त्या नगण्यच आहेत. या परतीच्या प्रवासाचेहि विस्तृत वर्णन आहे. मात्र त्यावरूनहि कैकेय देश कोठे होता त्याचा उलगडा होत नाही. अनेक नद्या ओलांडून भरत यमुनेपाशी आला पण यमुना ओलांडल्याचा उल्लेख नाही. नंतर तो गंगा व गोमती ओलांडून अयोध्येला आला. केकय देश यमुनेच्या पश्चिमेला, दक्षिणेला कीं गंगायमुनांच्या मधल्या अंतर्वेदीत हे कळत नाही, कारण यमुना दोन्ही वेळा ओलांडलेली नाही! तेव्हां यमुनेच्या पूर्वेलाच पण बराच उत्तर भागांत असावा एवढेच म्हणतां येईल. अयोध्येजवळ आल्यावर

सर्वांना मागे ठेवून भरत एकटाच अयोध्येत शिरला. या प्रवासाला आठ दिवस लागले असे म्हटले आहे. भरत सरळ पित्याच्या भवनात गेला व तेथे पिता नसल्यामुळे कैकेयीमातेच्या भवनात शिरला.

दशरथाचा मृत्यु झाला व एकहि पुत्र जवळ नसल्यामुळे त्याची उत्तरक्रियाही झाली नव्हती आणि त्यामुळे भरताला तातडीने बोलावले होते. पण त्याच्या येण्याची खबर मंत्र्यांना वा वसिष्ठाला लगेच मिळण्याची कोणतीच व्यवस्था केलेली नव्हती असे दिसते. हे जरा चमत्कारिकच वाटते. कोणालाही भरत आल्याची बातमी कळण्याआधी तो सरळ कैकेयीलाच भेटला. राम-लक्ष्मण-सीता वनात गेल्याची व पिता दशरथ मृत्यु पावल्याची हकीगत भरताला मातेकडून कळली. कैकेयी-भरत संवादाबद्दल आपणाला माहीतच आहे.त्यामुळे लिहिण्याची गरज नाही. यावेळीहि, 'दशरथाने पूर्वीच केकयनरेशाला दिलेल्या वचनाप्रमाणे तुझाच राज्यावर हक्क होता व तोच मी मागितला' असे कैकेयी भरताला म्हणत नाही. तिला त्या वचनाबद्दल माहितीच नसावी असे स्पष्ट दिसते.

आईचा धि:कार करून भरत बाहेर पडला तो कौसल्येला भेटला. तिने झाल्या गोष्टीबद्दल भरताला दोष दिला तो मात्र नाकारून 'मला काहीच माहीत नाही' असे त्याने म्हटले. रात्र होईपर्यंत इतर कोणीच भरताला भेटले नाही. त्यामुळे तो आल्याचेहि कोणाला कळले नाही. दुसऱ्या दिवशी दशरथाच्या प्रेताचे दहन होऊन मग तेरा दिवस सर्व उत्तरक्रिया झाली. दूत केकय देशाला जाऊन मग भरत आला त्यांत १२-१३ दिवस गेले होते. त्यामुळे दशरथाच्या मृत्यूनंतर २४-२५ दिवसांनी भरताला राज्य स्वीकारण्याचा आग्रह सुरू झाला. त्याने ठाम नकार दिला. रामाला परत बोलावण्यासाठी स्वत:च त्याच्या भेटीला जाण्याचा बेत त्याने केला. भरत ससैन्य व कुटुंबीय व मंत्र्यांसह जाणार असल्यामुळे अयोध्येपासून गंगाकाठापर्यंत नवा रस्ता बनवला गेला! त्याचे खुलासेवार वर्णन केले आहे. त्यासाठी किती दिवस लागले ते सांगितलेले नाही. रामाने गंगा ओलांडली त्यानंतर सुमंत्र परत जाणे, दशरथनिधन, दूतप्रवास, भरतप्रवास, उत्तरक्रिया, प्रवास तयारी व भरताचा गंगाकाठापर्यंत प्रवास यांत एक महिन्याहून जास्त काळ गेला असे दिसते. गंगाकिनाऱ्यावर भरतही गुहकालाच भेटला. त्याला प्रथम भरताच्या हेतूबद्दल शंकाच आली. पण भरताने त्याची खात्री पटवली. मग त्याने ५०० नौका जमवून सर्व लवाजम्यासकट भरताला गंगापार केले. भरत प्रयागात भारद्वाज आश्रमात जाऊन त्याना भेटला. त्यानाहि प्रथम भरताच्या ससैन्य वनात येण्याच्या हेतूबद्दल शंकाच वाटली. (एकटा लक्ष्मणच शंकेखोर नव्हे!) मात्र नंतर भरताच्या बोलण्यावरून खात्री पटून 'राम-लक्ष्मण-सीता चित्रकूटावर आहेत' अशी माहिती

त्यानी भरताला दिली. एक रात्र गंगातीरावर मुक्काम करून मग सर्वजण चित्रकूटाकडे निघाले. चित्रकूट यमुनेच्या दक्षिणेला असताना, भरताने यमुना ओलांडल्याचा उल्लेख नाही. चित्रकूटाच्या उत्तरेला मंदाकिनी नदी असल्याचे वर्णन आहे. पण रामाने वा भरताने मंदाकिनी ओलांडल्याचा उल्लेख नाही. ही मंदाकिनी कोणती? हिमालयामध्ये अलकनंदा व मंदाकिनी या नद्या आहेत ती मंदाकिनी अर्थातच ही नव्हे. इतरत्र वाचावयास मिळाले व विकिमॅपियावर एक नकाशा पहावयास मिळाला त्यावरून मध्यप्रदेशात एक मंदाकिनी नावाची नदी आहे व ती अलाहाबादच्या वरच्या बाजूला काही अंतरावर यमुनेला मिळते. तिच्या आग्नेयेला चित्रकूट हे तीर्थक्षेत्र आहे व ते मंदाकिनीच्या किनारी आहे. त्यामुळे यमुना प्रयागपाशी ओलांडली तर चित्रकूटाच्या वाटेवर मंदाकिनी ओलांडावी लागणार नाही. रामायणात चित्रकूट प्रयागापासून दहा कोस दूर असल्याचे भरद्वाजानी रामाला म्हटले आहे. प्रत्यक्षात चित्रकूट प्रयागपासून १०० पेक्षा जास्त मैल, जबलपूर-अलाहाबाद रेल्वे मार्गापासून बांद्याकडे जाणाऱ्या रेल्वेफाट्यावर कारवी नावाच्या स्टेशनच्या जवळ आहे. तेच रामाच्या वस्तीने पावन झालेले रामायणातील चित्रकूट असे मानले जाते. तेव्हां भरद्वाजाने रामाला सांगितलेले अंतर सपशेल चुकलेले होते असे म्हणावे लागते.

*(या चित्रकूटाबद्दल थोडी ऐतिहासिक माहिती सांगण्याचा मोह आवरत नाही. रघुनाथराव पेशव्याला बारभाईनी पदच्युत केले. त्याचा बाजीराव हा औरस पुत्र व अमृतराव हा आधीचा दत्तक पुत्र. सवाईमाधवरावाच्या मृत्यूनंतर यांतील कोणालाच पेशवाई मिळू नये यासाठी नाना फडणिसाने नाना प्रयत्न केले. तरी अखेर बाजीरावच पेशवा झाला. अमृतराव त्याचा कारभारी झाला व तो फार कर्तबगार आहे असे इंग्रजांचे मत होते. पण बेबनाव होऊन अखेर सालिना आठ लाखाची जहागीर देऊन त्याला इंग्रजानी वाराणसीला पाठवले. तेथेच त्याची अखेर झाली. त्याचा पुत्र विनायकराव जहागीर संभाळून होता. तो नंतर चित्रकूटाला गेला. त्याच्या संस्थानाला कारवी संस्थान म्हणत. १८५३ मध्ये तो वारला. १८५७ पर्यंत संस्थान चालले. बंडात सामील असल्याचा खोटा आळ घेऊन इंग्रजांनी संस्थान खालसा केले व कारवीची प्रचंड प्रमाणावर लूट केली.)*

चित्रकूटावर रामलक्ष्मणांना भरताच्या सैन्याची चाहूल लागली तेव्हा रामाच्या सूचनेवरून लक्ष्मणाने झाडावर चढून पाहिले व अयोध्येचे सैन्य असे ओळखून, 'हा भरत आला आहे.त्याचा हेतु काय?' असा संशय व्यक्त करून त्याने रामाला सावध केले. रामाने मात्र, 'भरत मला प्रिय आहे, त्याला उगाच कठोर बोलू नको' असे त्याला बजावले. सैन्य व इतरांना मागे ठेवून भरत एकटाच रामाचा आश्रम शोधत पुढे आला. वनात

फिरताना वाट चुकू नये म्हणून लक्ष्मणाने झाडांना खुणेसाठी बांधलेली वस्त्रे त्याला दिसली, त्यांच्या सहाय्याने तो रामाच्या पर्णशालेत पोचला. तेथे त्याला अनेक शस्त्रे व धनुष्ये दिसली.

राम-भरतभेटीबद्दल आपणाला सविस्तर माहिती आहे. 'तूं वनांत कां आला आहेस' असे विचारल्यावर भरताने दशरथ मृत्यु पावल्याचे सांगितले. भरताने रामाला अयोध्येला परतून राज्य स्वीकारण्यासाठी परोपरीने विनवले. वसिष्ठानेहि कुलपरंपरा सांगितली मात्र 'मला वनवास व भरताला राज्य या पित्याच्या स्वच्छ आज्ञा आहेत व त्या मी मोडणार नाही, आता पित्याच्या मृत्यूनंतर तर वनवास आटोपल्यावरहि अयोध्येस येण्यास माझे मन घेणार नाही' असे राम म्हणाला. भरताने 'पित्याची चूक तूं दुरुस्त कर, त्याला अंतकाळीं भ्रम झाला, मी ज्येष्ठ पुत्र नसताना राज्य कसे स्वीकारूं?' असे अनेक युक्तिवाद केल्यावर येथे प्रथमच रामाने, दशरथाने कैकेयीच्या पित्याला विवाहसमयीं दिलेल्या वचनाचा उल्लेख केला. ही गोष्ट राम सोडून इतर कोणाला, वसिष्ठालाहि माहीत नव्हती. रामाला कशी माहीत होती? कधीतरी दशरथाच्या तोंडूनच रामाला ही गोष्ट कळली असली पाहिजे. पण मग सत्यवचनी म्हटला जाणारा राम, पित्याच्या इच्छेप्रमाणे अभिषेक करून घेण्यास कसा तयार झाला होता? त्याने पित्याला विरोध केला नाही वा त्याच्याच वचनाची आठवणही करून दिली नाही. 'माझे मन बदलत नाही व भरत दूर आहे तोवरच तू अभिषेक करून घे, सांभाळून रहा, तुला धोका आहे' असें दशरथ म्हणाला तेव्हांही रामाने प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. हे सत्यवचनी व भरतप्रेमी या रामाच्या लौकिकाशी मुळीच सुसंगत नाही.

रामाने भरताची समजूत घातली. '१४ वर्षे संपेपर्यंत मी परत येणार नाही व राज्य तुलाच संभाळावे लागणार आहे, कौसल्या सुमित्रा यांची काळजी घे, कैकेयीलाही शासन करूं नको'' वगैरे उपदेश केला. राम ऐकत नाही असे पाहून ऋषींनी भरताला परत फिरण्यास सांगितले. नाइलाजाने रामाच्या पादुका घेऊन भरत परत निघाला. 'मीहि १४ वर्षे राजधानी बाहेरच राहीन व पादुकांच्या आधारे राज्य सांभाळीन, १४ वर्षे पूर्ण होतांच तुम्ही दिसलां नाहीं तर प्राणत्याग करीन' असे रामाला म्हणाला.

या सर्व प्रसंगांत भरताचे थोर मन फारच उठून दिसते. आपल्याला राज्य मिळण्यात मोठा अन्याय झालेला नाही हे दिसल्यावरही त्याने राज्याचा लोभ केला नाही. रामाने भरताला वडील भाऊ या नात्याने उपदेश करणे वगैरे ठीक आहे पण एक गोष्ट विसरून चालणार नाही कीं राम भरतापेक्षां कांही तासांनीच मोठा होता! तेव्हां तारतम्य सोडून चालणार नाही. मुळात रामाने पित्याच्या इच्छेप्रमाणे राज्य स्वीकारण्याचे ठरवले होते पण कैकेयीने दशरथाला कोंडींत पकडल्याचे दिसल्यावर त्याने पित्याची सुटका केली व एकदां आपला राज्यावर हक्क नाही हे मान्य केल्यावर मात्र तो ठाम राहिला हे खरे.

भरत निराश होऊन अयोध्येला परत निघाला. त्याच्या परतीच्या प्रवासाच्या वर्णनांत मंदाकिनी ओलांडल्याचा उल्लेख आहे पण यमुना ओलांडल्याचा मात्र नाहीं! त्याशिवाय तो भरद्वाजाच्या आश्रमात पोचला कसा? येथे नद्या ओलांडण्याच्या वर्णनात थोडी विसंगति दिसते. तेथून पुढे अयोध्येच्या वाटेवर गंगा ओलांडल्याचा मात्र उल्लेख आहे! भरताला अयोध्या भकास दिसली आणि तेथे न थांबतां तो पूर्वेकडे नंदिग्रामाला पोचला. हे अर्थातच ममता बानर्जीमुळे गाजलेले नंदिग्राम नव्हे. ते दूर गंगेच्या मुखाशी आहे. रामायणातील नंदिग्राम अयोध्येच्या जवळच होते. त्यामुळे तेथे राहून भरताने १४ वर्षे राज्य चालवले. यानंतर रामायणाच्या जवळजवळ अखेरीपर्यंत भरताचा उल्लेख येत नाही. सीताहरणाचा वृत्तान्त त्याचेपर्यंत पोचलाच नाही त्यामुळे रामाच्या मदतीला अयोध्येचे सैन्य धावून गेले नाहीं.

यानंतर राम चित्रकूट सोडून पुढे गेला. मात्र चित्रकूटावर किती काळ राहिला याचा स्पष्ट उल्लेख नाहीं पण दीर्घकाळ राहिला असेहि म्हटलेले नाही. खुद्द चित्रकूट तीर्थात मात्र रामाने वनवासाचा बराचसा काळ तेथे काढला अशी ठाम समजूत आहे, ती खरी दिसत नाही. भरत गेल्यानंतर अनेक ऋषि चित्रकूट सोडून चालले असे रामाला दिसले. रामाच्या चित्रकूटावर राहण्य़ामुळे आपल्यामागे राक्षसांचा ससेमिरा लागेल अशी त्यांना बहुधा धास्ती वाटत असावी. रावणाचा भाऊ खर राक्षस याने 'जनस्थाना'तून सर्व तापसांना घालवून लावले होते असे म्हटले आहे पण हे जनस्थान कोठे होते याचा उल्लेख नाही. पत्नीसह राम चित्रकूटावरच राहिला तर धोका असल्यामुळे मुख्य तापसी निघून गेले त्याना राम थोपवू शकला नाही. ज्यांचा रामावर विश्वास होता ते राहिले. रामानेहि विचार केला कीं येथेच राहिलो तर माता, भरत, अयोध्यावासीयांच्या आठवणी येतच राहतील. भरताच्या ससैन्य मुक्कामामुळे या मुलखाचीहि फार हानि झाली आहे तेव्हां आपणही चित्रकूट सोडून जावे. हे रामायणातील स्पष्ट उल्लेख असे निश्चितच दर्शवतात कीं भरत गेल्यावर पावसाळयापूर्वीच राम चित्रकूट सोडून गेला. अकरा वर्षे खासच राहिला नाही जसे चित्रकूटात मानले जाते!

रामायण पुढे म्हणते कीं चित्रकूटावरून राम निघाला तो अत्रि ऋषींच्या आश्रमाला पोचला. कोणत्या मार्गाने वा किती प्रवास करून पोचला हे काहीच सांगितलेले नाहीं. अत्रिऋषीनीं रामाचा सत्कार केला उपदेश केला. अनुसूयेने सीतेकडून सर्व हकीगत समजावून घेतली. येथे सीतेने तिला सांगितलेल्या पूर्वेतिहासांतहि कांही विसंगति दिसतात. सीता म्हणाली 'मी विवाहयोग्य झाले म्हणून पित्याने माझे स्वयंवर मांडले. शिवधनुष्य सज्ज करण्याचा पण होता. कोणाही राजाला धनुष्य पेलले नाही व ते सारे परत गेले. त्यानंतर दीर्घ काळाने रामलक्ष्मण मिथिलेला आले.' राम मिथिलेला आला तेव्हां जेमतेम १६ वर्षांचा होता. व लगेच त्याचा व सीतेचा विवाह झाला तेव्हां त्यावेळी सीताहि फारतर १२-१३ वर्षांची असणार! मग तिचे पूर्वीचे स्वयंवर दीर्घ काळापूर्वी जनकाने कसे योजले असेल? तेव्हां तर ती अगदींच बालिका असणार, विवाहयोग्य खासच नसणार!

अत्रिऋषींचा निरोप घेऊन राम निघाला तो पुढे गेला तो मुलूख 'राक्षसांचा उपद्रव होणारा' असा वर्णिला आहे. मात्र पुढील प्रवासाचे वर्णन वा भौगोलिक संदर्भ मुळीच सांगितलेले नाहीत.

येथे अयोध्याकांड संपले. रामाच्या यापुढील प्रवासाचा विचार पुढील कांडांच्या संदर्भांत करावयाचा आहे. भौगोलिक संदर्भांच्या बाबत आणखी एका गोष्टीचा उल्लेख करून विषय संपवूं. जिला सध्या अयोध्या म्हणतात तीच रामायणातील अयोध्या काय? अशीहि एक शंका घेतली जाते! वाचनात आलेल्या एका अभ्यासपूर्ण पुस्तकांत उत्तरकांडातील एका श्लोकाचा संदर्भ देऊन लेखकाने म्हटले आहे कीं अयोध्येपाशीं शरयू नदी ही पश्चिमवाहिनी असल्याचे रामाने सीतेला (पुष्पकविमानातून) दाखवले. प्रत्यक्षात अयोध्येपाशी शरयू दक्षिणवाहिनी व अयोध्येच्या पश्चिमेस आहे! लेखकाने असे दाखवून दिले आहे कीं शरयू हिमालयभागात प्रथम पश्चिमवाहिनी असून मग ती एका खिंडीतून खाली मैदानी भागात उतरते. मग रामायणातील अयोध्या हिमालयात शरयूच्या पश्चिमवाहिनी भागाच्या काठावर होती कीं काय?

अयोध्याकांडातील रामकथा मुख्यत्वे आपल्या मनातील रामकथेशी जवळपास जुळणारी आहे. मात्र काही घटनांवर, भौगोलिक व कालवाचक संदर्भांवर व व्यक्तिमत्त्वांवर मूळ रामाय़ण चिकित्सकपणे वाचले असतां कांही नवीन प्रकाश जरूर पडतो व शंकास्थळे नजरेला येतात. त्यांचे थोडेफार दर्शन घडवण्याचा माझा हेतु साध्य झाला असावा असे वाटते.



Bharata Meets Rama in Chitrakuta, ca. 1740-50 A.D.

# अरण्यकांड

अत्रिऋषींच्या भेटीपाशी अयोध्याकांड संपले होते. अरण्यकांडामध्ये रामाचा तेथून पुढला वनातील प्रवास वर्णिला असून सीताहरणापर्यंत त्याचा विस्तार आहे. अत्रिऋषींच्या भेटीनंतर राम-लक्ष्मण-सीता दंडकारण्यात गेले. राक्षसांचा उपद्रव असलेल्या प्रदेशात ते बराच काळ फिरत राहिले असे म्हटले आहे. अनेक मुनींना भेटले सर्वांनी राक्षसांच्या उपद्रवाबद्दल तक्रारी करून तूं आमचे रक्षण कर असे म्हटले. रामाने ते मान्य केले. हे मुनीना सतावणारे, नरभक्षक, यज्ञाचा विध्वंस करणारे (मानव)समाज म्हणजे राक्षस ही एक वेगळीच जमात म्हटली पाहिजे. रावणालाहि राक्षस म्हटले आहे पण रावण स्वत: सुसंस्कृत, यज्ञप्रेमी व विद्वान, त्याचे अनेक मंत्री व प्रजाजनहि यज्ञ करणारे असे पुढे वर्णन केले आहे त्यांचे या जमातीशी काही नाते मानता येणार नाही. मात्र ही नरभक्षक जमात रावणाच्या अंकित होती असे दिसते व त्यांची लंकेतहि वसती असावी कारण रावणाच्या सैन्यात त्यांचा समावेश होता.

रामाची गाठ विराध नावाच्या राक्षसाशी पडली. कोणत्याही शस्त्राने न मरण्याचा वर त्याला ब्रह्मदेवाने दिला होता! तो रामाशी बोलला! कोणत्या भाषेत ते सांगितलेले नाही. आपल्या वराची माहिती त्यानेच रामाला दिली. महत्प्रयासाने राम-लक्ष्मणांनी त्याला मारले, कसे तर, एक मोठा खड्डा करून, अर्धमेला झाल्यावर त्याला गाडून टाकले. अनपेक्षित अडचणीवर युक्तीने मात केली. नरभक्षक राक्षस व राम यांचा प्रत्यक्ष संग्राम मात्र, दुसरा एकहि, पंचवटीला जाईपर्यंत वर्णिलेला नाही. विराधवधानंतर राम शरभंग मुनीच्या आश्रमास गेला. त्यानंतर पुन्हा अनेक मुनींनी राक्षसांपासून रक्षण करण्याची विनंति केली व रामाने ती मान्य केली. मुनीनी केलेल्या राक्षसांच्या अत्याचारांच्या वर्णनात तुंगभद्रा नदी व जवळचे पंपासरोवर, तसेच मंदाकिनी नदी व चित्रकूट या दोन्हीचा उल्लेख आहे. म्हणजे हा सर्वच मुलूख राक्षसांच्या उपद्रवाने ग्रस्त होता. राम मुनीना म्हणाला कीं राक्षसांच्या शासनासाठीच पित्याच्या आज्ञेने मी वनात आलो आहे. मात्र दशरथाने रामाला असा काही आदेश दिलेला नव्हता!

यानंतर हे मुनिगण व राम-लक्ष्मण सुतीक्ष्ण मुनीच्या आश्रमाला 'दुथडी वाहणाऱ्या नद्या' पार करून गेले. कोणत्या नद्या हे सांगितलेले नसल्याने सुतीक्ष्णाचा हा आश्रम कोठे होता व राम चित्रकूटापासून किती दूर वा किती दक्षिणेला आला होता हे कळत नाही. 'माझ्या निवासासाठी मी कोठे कुटी बांधावी' असे रामाने सुतीक्ष्णाला विचारले. चित्रकूट सोडल्यापासून हा वेळपर्यंत रामाने कोठेच कुटी बांधलेली नव्हती. सुतीक्ष्णाने म्हटले कीं हा माझा आश्रमच तुमच्या निवासाला योग्य आहे. पण रामाने ते मानले नाही. एक रात्रच मुक्काम करून राम निघाला तेव्हा सुतीक्ष्णाने म्हटले कीं दंडकारण्यातील मुनींचे आश्रम पहात फिरा व नंतर पुन्हा येथे या.

रामाने मुनींना राक्षसांपासून संरक्षण करण्याचे आश्वासन दिले होते,पण सीतेने नवव्या सर्गात असे म्हटले कीं 'आपण वनात असताना मुनिवृत्तीने रहावे, क्षात्रधर्माने वागूं नये, प्राण्यांची हिंसा करू नये व राक्षसांशीहि अकारण वैर धरूं नये. अयोध्येस परत गेल्यावर मग क्षात्रधर्माचे पालन करावे!' मात्र रामाने हा सल्ला मानला नाही व राक्षसांचे पारिपत्य करणे हे माझे काम आहे असे बजावले. प्रत्यक्षात मात्र विराध सोडून इतर कोणाही राक्षसाशी रामाचे युद्ध झालेले नाही! विराधाने स्वत:च राम-लक्ष्मणांवर हल्ला केला होता, मुनीना त्रास दिला म्हणून त्याचे पारिपत्य केले नव्हतेच.

रामाचा प्रवास चालूच होता. वाटेत लागलेल्या पंचाप्सर नावाच्या सरोवराचे वर्णन सर्ग ११ मध्ये येते पण स्थळाचे भौगोलिक संदर्भ नाहीत त्यामुळे राम कोठवर पोचला होता याचा उलगडा होत नाही. यानंतर रामाने निरनिराळया मुनींच्या आश्रमांत निवास करीत दहा वर्षे काढली असा स्पष्ट उल्लेख आहे. चित्रकूट सोडल्यापासून आतापर्यंत रामाने कुटी बांधून कोठेहि वास्तव्य केलेलेच नाही! चौदा वर्षांपैकी ३-४ महिने चित्रकूटावर राहून त्यानंतर दीर्घकाळ प्रवासात व निरनिराळया मुनींच्या आश्रमांत व्यतीत झाला. विराध सोडून एकाही राक्षसाशी युद्ध झाले नाही. निव्वळ रामाच्या वावरामुळे राक्षसांचा उपद्रव शमला होता असे म्हणावे लागते. या दीर्घ प्रवासानंतर राम पुन्हा सुतीक्ष्णाच्या आश्रमाला आला व त्यांचा सुतीक्ष्णाने सन्मान केला.

मग रामाला अगस्त्य ऋषींना भेटण्याची इच्छा झाली व सुतीक्ष्णानेहि दुजोरा देऊन जवळच चार योजनांवरील अगस्त्याच्या आश्रमाचा रस्ता सांगितला. वाटेतील अगस्त्याच्या भावालाहि भेट देऊन राम अगस्त्य मुनीना भेटला. अगस्त्यांनी रामाला अनेक आयुधे दिलीं. रामाने अगस्त्यांना विचारले कीं मी कोठे कुटी बांधावी? अगस्त्यांच्या

आश्रमस्थळाचे भौगोलिक संदर्भ नाहीत पण त्याने रामाला सुचवले कीं दोन योजनांवरील पंचवटी हे स्थळ तुमच्या निवासासाठी योग्य. येथे मात्र 'गोदावरीतीराजवळील' असा स्पष्ट भौगोलिक संदर्भ प्रथमच मिळतो. सध्याच्या पंचवटीचे गोदासान्निध्य पाहतां तीच रामायणातील पंचवटी मानतां येते. चित्रकूट ते पंचवटी एवढे दीर्घ अंतर रामाने ११-१२ वर्षे प्रवासात काटले असे दिसते मात्र प्रवास मार्ग कळत नाही. पुढे इतिहासकाळात उत्तरेकडून दक्षिणेत येण्याचा मार्ग बऱ्हाणपुरावरून खानदेशातून (मोगलकाळी) वा राजस्थान, सौराष्ट्र गुजरात असा असे. राम मध्यभारतातून विंध्य-सातपुडा ओलांडून आला असावा.

पंचवटीच्या वाटेवर जटायु भेटला, मनुष्यवाणीने बोलला व मीहि तुमच्या आश्रयाने राहीन असे म्हणाला. तेव्हा ही एक आर्यांशी मैत्रीने वागणारी मानवांचीच जमात म्हटली पाहिजे.

पंचवटीवर लक्ष्मणाने कुटी बांधली. चित्रकूटावरहि त्यानेच बांधली होती. सेतू बांधायला राम इंजिनिअर होता का असा प्रश्न हल्ली केला गेला. कुटी बांधणारा लक्ष्मण बहुधा इंजिनिअर असावा ! पंचवटीवरहि रामाचे वास्तव्य ३-४ महिनेच झाले.

पंचवटीत रामाचे वास्तव्य फारसे झाले नाही. पंचवटीत रहावयास आले तेव्हां शरद ऋतु चालू होता असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. त्यानंतर हेमंत व शिशिर हे दोनच ऋतु राम-लक्ष्मण-सीता यांचे पंचवटीत वास्तव्य झाले. रावणाने सीतेचे हरण केले तेव्हां शिशिर संपत आला होता कारण नंतर राम-लक्ष्मण वनात भटकत असताना हा वसंत ऋतु चालू आहे असे राम वारंवार म्हणतो व वसंताच्या शोभेचे वर्णन करतो. पद्मपुराणात सीताहरणाची तिथि माघ व. अष्टमी अशी दिली आहे. हा उल्लेख रामायणाच्या भाषांतरातहि आहे. तेव्हा शिशिर अर्धा संपला होता याला दुजोरा मिळतो.

चित्रकूट व पंचवटी दोन्ही ठिकाणी रामाचे वास्तव्य अल्पकाळच झाले हे स्वच्छ असूनहि चित्रकूटात समजूत आहे कीं रामाचे चित्रकूटात दीर्घकाळ वास्तव्य झाले व महाराष्ट्रात समजूत आहे की पंचवटी हे रामाचे वनवासातील प्रमुख वास्तव्यस्थळ! चित्रकूटापासून पंचवटीपर्यंत रामाचा प्रवास दीर्घकाळ व अज्ञात मार्गाने झाला. अनेक नद्या, विंध्य व सातपुडा ओलांडावे लागले असणार. अजूनहि हा भाग दुर्गम आहे व आदिवासी वसतीचा आहे. या आदिवासी समाजांमध्ये रामाच्या प्रवासमार्ग व वास्तव्याबाबत असलेल्या समजुतींचे संकलन व अभ्यास केला तर कदाचित रामाच्या प्रवासमार्गावर काही प्रकाश पडेल. असा कांही अभ्यास वा संशोधन झाले असल्यास माहीत नाही. या संदर्भात, डॉ.

सांकलिया नावाच्या पुरातत्त्ववेत्याच्या मते राम विंध्य ओलांडून दक्षिणेत आलाच नाही व रामायणातील लंका म्हणजे श्रीलंका नव्हेच असे वाचलेले स्मरते. याला मुख्य आधार म्हणजे, सालवृक्ष दक्षिण भारतात तुंगभद्रा परिसरात, जेथे किष्किंधा होती असे वर्णनावरून दिसते, तेथे आढळत नाहीत, याउलट, मध्यभारतात, सातपुड्याच्या उत्तरेला मुबलक होते. नेपानगरची न्यूजप्रिंट फॅक्टरी सालाइ झाडांपासून कागद बनवण्यासाठी बांधली गेली. (गेल्या काही वर्षात मात्र या सलाई वृक्षांची वारेमाप तोड झाली आहे.) डॉ. सांकलियांपाशी इतरहि अनेक आधार असतीलच. त्यांचे मत खरे असेल तर मग पंचवटी (गोदावरी तीरी म्हटलेली)व जनस्थान महाराष्ट्रात नव्हे तर कोठे होतीं? खरे खोटे 'राम जाणे!'

राम-लक्ष्मण-सीता पंचवटीत राहू लागल्यावर घडलेला महत्वाचा प्रसंग म्हणजे शूर्पणखेच्या भेटीचा. हा वेळपर्यंत विराध सोडून इतर कोणाही नरभक्षक राक्षसाशी वा रावणाच्या अनुयायाशी रामाची भेट वा झगडा झालेला नव्हता. रावणपक्षाचा एक खर नावाचा प्रमुख वीर, शूर्पणखेचा भाऊ व रावणाचाहि भाउबंद, मोठ्या सैन्यबळासह पंचवटीजवळच जनस्थानात राहत होता. त्याला राम-लक्ष्मण पंचवटीत आल्याचे माहीत नव्हते, पण सान्निध्यामुळे संघर्ष केव्हातरी अटळ होता. खराच्या सैन्यात धनुष्यबाणाने लढणारे वीर थोडेसेच होते. इतर सर्व सैन्य हाताने चालवण्याच्या वा फेकून मारण्याच्या शस्त्रांनी लढणारे होते असे पुढील समरप्रसंगाच्या वर्णनावरून दिसते. हे सर्व स्थायिक नरभक्षक जमातींची असावे.

राम दिसल्यावर शूर्पणखेने त्याची अभिलाषा व्यक्त केली. राम-लक्ष्मणांनी तिची टवाळी केली. तिला राक्षसी म्हटले आहे व विद्रूप असे वर्णन केले आहे तसेच 'सुंदर' असेहि म्हटले आहे. ती रावणाची बहीण, म्हणजे नरभक्षक जमातीची खासच नव्हती. त्यामुळे तिचे विद्रूप असे वर्णन तिला राक्षसी म्हणण्याशी निगडित आहे. रावण व त्याचे कुटुंब व प्रमुख मंत्री, हे यज्ञसंस्कृति मानणारे होते. यज्ञांचा विध्वंस करणाऱ्यांपैकी नव्हते. त्यांचा राम प्रतिनिधित्व करणाऱ्या आर्यकुळांशी दीर्घकाळाचा वैरभाव कां होता? सत्तास्पर्धा हे एकच कारण होते काय? आर्यावर्तातील क्षत्रियकुळांशी वैर होते म्हणून तर रावण लंकेमध्ये सुरक्षित राजधानी बनवून राज्य करत होता काय? हे एक न उलगडलेले कोडे आहे. काही वेळ शूर्पणखेची टवाळी केल्यावर राम-लक्ष्मणानी तिला समजावून परत पाठवण्याऐवजी तिला विद्रूप केले याला खरे तर काही सबळ कारण नव्हते. हे मुद्दाम खुसपट

काढल्यासारखेच वाटते! जणू राम-लक्ष्मणाना आता, रावणाबरोबर अद्याप न घडलेला, संघर्ष हवाच होता.

शूर्पणखेच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी खर, दूषण, त्रिशिरा हे तीन वीर व जनस्थानातील त्यांची मोठी सेना चालून आली. त्या सैन्यात हे तीन वीरच धनुष्य-बाणाने लढणारे होते, इतर सर्व हाताने चालवण्याच्या वा फेकून मारण्याच्या शस्त्राने लढणारे होते. हे जनस्थान पंचवटीच्या जवळपासच होते व स्थानिक नरभक्षक लोकांच्या सहायाने येथे रावणाने आपले ठाणे वसवले होते असे म्हणावे लागते. अद्याप त्यांचा आर्यावर्तातील कोणा राजाशी संघर्ष झालेला वर्णिलेला नाही. पण संभाव्य संघर्षाची ही रावणाची पूर्वतयारी दिसते.

लक्ष्मणाला सीतेच्या संरक्षणासाठी ठेवून रामाने एकट्यानेच त्याना तोंड दिले. युद्धाचे खुलासेवार वर्णन वाचावयास मिळते. सर्व सैन्य मारले जाऊन एकटा खर उरला व तोही अखेर मारला गेला. रामाने एकहि 'अस्त्र' वापरल्याचा उल्लेख नाही. फक्त धनुष्यबाण वापरून कितीहि पराक्रमी धनुर्धर असला तरी किती सैन्य मारू शकेल? महाभारतात सर्व धनुर्धर मोठ्या सैन्याविरुद्ध अस्त्रांचा सर्रास वापर करतात. तेव्हा खराचे सैन्य १४,००० होते ही अतिशयोक्ति म्हटली पाहिजे. युद्ध संपल्यावर लक्ष्मण व सीता गुहेतून बाहेर आलीं व रामाला फारशा जखमा झालेल्या नाहीत असे पाहून आनंदित झालीं.

खराचा ससैन्य नाश झाल्याचे वृत्त अकंपन नावाच्या वांचलेल्या सैनिकाने रावणाला सांगितले. रामाच्या बळाचे व युद्धकौशल्याचे त्याने वर्णन केले. 'रामाला युद्धात हरवणे सोपे नाही तेव्हा सीतेला पळवून आणलीस तर राम विरहानेच मरेल' असे त्याने रावणाला सुचवले. हा सीताहरणाबाबत पहिला उल्लेख आहे. हा रावणाचा स्वत:चा मूळ बेत नाही. मात्र रावणाला हा सल्ला पटला व तो एकटाच निघाला व मारीचाच्या आश्रमात जाऊन त्याला भेटला. जनस्थानातून रावणाचे ठाणे उठल्यामुळे काहीतरी केले पाहिजे असे त्याला जाणवले. ही रावण-मारीच यांची पहिली भेट. तिच्याबद्दल आपण वाचलेले नसते! मारीच हा ताटकेचा पुत्र असल्यामुळे मदत करील अशी रावणाची साहजिकच अपेक्षा होती. हा मारीचाचा आश्रम कोठे होता याचा काही खुलासा नाही.

मात्र यावेळी मारीचाने रावणाला म्हटले, 'सीतेच्या हरणाचा सल्ला तुला देणारा तुझा शत्रूच म्हटला पाहिजे. रामाच्या तूं वाटेस जाऊं नको ते तुला झेपणार नाहीं. तूं

लंकेत सुखाने राज्य कर व रामाला पंचवटीत सुखाने राहूंदे!' नवल म्हणजे रावणाने हा सल्ला मानला व तो लंकेला परत गेला!

यानंतर खराचा ससैन्य नाश झाल्यामुळे फार उद्विग्न झालेली शूर्पणखा स्वत:च रावणाकडे गेली. स्वत:चा झालेला अपमान तिने रावणाला सांगितला व त्याला फटकारले कीं 'जनस्थानातील तुझी सत्ता रामाने उखडून टाकली याचा तुला पत्ता नाही काय?' तिच्याकडून सर्व हकीगत ऐकून रावण चिंतातुर झाला. शूर्पणखेने राम-लक्ष्मण-सीता यांचे बळ व सौंदर्य याचे वर्णन रावणाला ऐकवले. मी सीतेला तुझ्यासाठी घेऊन येण्याचा प्रयत्न करत होते म्हणून मला लक्ष्मणाने विरूप केले असे खोटेच सांगितले. 'सीतेला तूं पळवून आण' असे तिने सुचवले नाही. रावणाने स्वत:च मंत्रिगणांशी बोलणे करून सीतेचे हरण करण्याचा बेत नक्की केला.

रावण रथातून समुद्रकिनाऱ्यापर्यंत आला व मग विमानाने भारतात येऊन पुन्हा मारीचाला भेटला. विमानाचा उल्लेख आहे पण वर्णन नाही. विमान म्हणजे काय हे गूढच आहे. रावणाने पुन्हा मारीचाला खर-दूषणांचा ससैन्य नाश झाल्याचे सांगून रामाने दंडकारण्याचे अभयारण्य केले आहे असे म्हटले. रामाला त्याच्या पित्याने क्रोधाने पत्नीसह घराबाहेर काढले आहे असेहि म्हटले व सीतेला पळवून आणण्याचा बेत सांगून मारीचाचे सहाय्य मागितले. ते ऐकून मारीचाचा भयाने थरकाप झाला. त्याला रामाच्या पराक्रमाचे दर्शन घडलेले होते. त्याने रावणाला पुन्हापुन्हा विनवले कीं 'तूं हा बेत मनात आणू नको, रामाने पितृवचनाचा मान राखण्यासाठी वनवास पत्करला आहे. त्याच्याशी वैर धरू नको. तुला ते झेपणार नाही. तूं बिभीषणाचा सल्ला घे. विश्वामित्राच्या सांगण्यावरून राम बालवयातच आमच्या पारिपत्यासाठी आला तेव्हा आमचा सर्वनाश झाला. माझा जीव कसाबसा वांचला. हल्लीच पुन्हा मृगरूपाने दोन मित्रांबरोबर दंडकारण्यात गेलो असतां रामाच्या बाणाने मरतांमरतां वांचलों, माझे मित्र मेले. त्यामुळे मला रामाची फार भीति वाटते. एकतर तूं सरळ रामाशीं युद्ध कर किंवा सर्व विसरून लंकेत सुखाने रहा. खराने रामावर आक्रमण केले व रामाने त्याला युद्धात मारले यांत त्याचा काय दोष? त्याच्याशी वैर धरू नको'. मारीचाने पुन्हापुन्हा हिताचा सल्ला दिला पण रावणाने तो मानला नाही.

रावणाने मारीचाला म्हटले 'मी तुझा सल्ला फक्त माझ्या बेतात काय कमीजास्त करावे एवढ्यापुरताच विचारला व मदत मागितली, तुझी परवानगी मागितली

नाही. बुद्धिमान मंत्री राजाने विचारल्यावरच आपला विचार नम्रपणे, हात जोडून सांगतो! तूं मृगरूपाने राम-लक्ष्मणाना दूर ने, मग मी सीतेला पळवून नेईन. मग तूं कुठेही जाऊं शकतोस. तुला अर्धे राज्य देईन पण तू विरोध केलास तर जबरदस्तीने तुझ्याकडून हे करून घेईनच नाहीतर तुला मारून टाकीन.' मारीचाने प्रतिकूल विचार पुन्हापुन्हा ऐकवले पण रावण मानेचना तेव्हां नाइलाजाने 'तुझ्या हातून मरण्यापेक्षां रामाचे हातून मरण आलेले बरे' असे म्हणून कबुली दिली. मारीचाबद्दलच्या आपल्या पूर्वकल्पनांपेक्षां त्याचे वर्तन वेगळे वर्णिले आहे.

बेत ठरल्यावर दोघेहि लगेच आकाशमार्गाने जाणाऱ्या रथाने निघाले. त्यालाच पुढे 'विमानाकार रथ' असेहि म्हटले आहे. त्यामुळे खूप वेगाने प्रवास करूं शकणारा रथ एवढाच 'विमाना'चा अर्थ अभिप्रेत असावा असे वाटते. हे विमान सीताहरणाच्या वेळी जटायुकडून नष्ट झाले असे पुढे वर्णन आहे. त्या अर्थी हे 'पुष्पक' विमान नव्हे. तें लंकेत सुखरूप होते. पंचवटीला पोंचल्यावर मारीचाने लगेच मृगरूप धारण केले. पुढचा कथाभाग आपणास परिचित आहे तसाच जवळपास रामायणात आहे. लक्ष्मणाने 'हा मृग म्हणजे मारीच असावा' असा संशय व्यक्त केला तेव्हां रामाने म्हटले, 'हा मृग असेल तर सीतेला हवे असलेले सोन्याचे कातडे मिळेल आणि हा मारीच असेल तर याला मारलेच पाहिजे कारण याने असेच फसवून इतर शिकार करण्यासाठी रानात आलेल्या राजांना मारले आहे.' तेव्हां एकटी सीताच फसली होती, रामलक्ष्मणांना सोन्याच्या कातड्याचा लोभ पडला नव्हता! सीतेच्या रक्षणाचे काम लक्ष्मण व जटायु यांच्यावर सोपवून राम मारीचाच्या पाठीवर गेला. खूप दूर गेल्यावर रामाचा बाण लागून मरताना मारीचाने रामाच्या आवाजात 'हा सीते, हा लक्ष्मण' अशा आर्त हाका मारल्या. सीतेने निष्कारण संशय व्यक्त केला म्हणून नाइलाजाने लक्ष्मण रामाच्या मदतीला गेला. त्याने सीतेला सावध रहाण्यास सांगितले मात्र 'लक्ष्मणरेषा' असा काहीहि प्रकार रामायणात मुळीच नाही. ती निव्वळ हरदासी कथाच! लक्ष्मणावर नाहक संशय घेताना सीतेने विवेकाची लक्ष्मणरेषा आधीच ओलांडली होती.

मारीचाने मरताना मारलेल्या आर्त हाका लक्ष्मण व सीता यांना ऐकूं आल्या त्याअर्थी मारीच व राम फार दूर गेलेले नव्हते. मारीच मेल्यावर रामाला शंका आली व म्हणून तो घाईघाईने परत फिरला. हाका ऐकू आल्यावर लक्ष्मण व सीता यांच्यात बराच वादविवाद झाला व अखेर नाइलाजाने लक्ष्मण निघाला यांत काही काळ गेलाच. लक्ष्मणाला

राम वाटेतच भेटला व दोघे घाईने परतले. लक्ष्मण निघून परत येईपर्यंत थोडाच वेळ गेला असणार. परत येतात तोंवर रावणाने सीतेला नेलीच होती.

लक्ष्मण कुटी सोडून गेलेला पाहिल्यावर रावण कुटीपाशी आला. सीतेने त्याचे स्वागत केले. रामायण म्हणते दोघांमध्ये लांबलचक संभाषण झाले. रावणाने प्रथम ब्राह्मणवेषाला साजेसे वेदमंत्र म्हटले. मग तिच्या सौंदर्याचे वर्णन करून तूं कोण व या धोकादायक वनात काय करीत आहेस असे विचारले. सीतेने आपला इतिहास विस्ताराने सांगितला. मग रावणाने स्वत:ची ओळख विस्ताराने सांगून तिला वश होण्यास विनविले. सीतेने त्याला झिडकारल्यावर अखेर त्याने तिला पकडले व उचलून घेऊन तो निघाला. हे सर्व होईपर्यंत राम-लक्ष्मण परत कसे आले नाहीत? याचा अर्थ असा घ्यावा लागतो कीं लक्ष्मण बाहेर पडलेला दिसल्याबरोबर अजिबात वेळ फुकट न घालवतां रावणाने सरळ सीतेला उचलले! संभाषणात वेळ घालवला नाही. सीता वश होईल अशी भाबडी कल्पना तो कशाला बाळगील?

रामायण म्हणते , सीतेने या प्रसंगी रावणाला आपली माहिती विस्ताराने सांगितली. तिने म्हटले, 'आमचा विवाह झाल्यावर आम्ही बारा वर्षे अयोध्येत सुखात राहिलो. मग कैकेयीच्या मागणीमुळे आम्हाला वनात यावे लागले, यावेळी रामाचे वय २५ व माझे १८ होते.' तर मग म्हणावे लागते विवाहाचे वेळी राम १३ वर्षांचा व सीता ६ वर्षांची होती. हे अतिशयोक्त वाटते. रामाची मागणी विश्वामित्राने केली तेव्हां 'राम फक्त सोळा वर्षांचा आहे' असे दशरथ म्हणाला होता. दुसरें म्हणजे विवाहानंतर बारा वर्षे अयोध्येत गेलीं तर एवढा दीर्घ काळ भरत-शत्रुघ्न कैकय देशालाच होते काय़? ते परत आल्याचा मुळीच उल्लेख नाही! यांत थोडीफार विसंगति आहे. रामायण एकहातीं वाल्मिकीचे मग त्याने अशी विसंगति कां येऊं दिली असेल? मारीच रावणाला म्हणाला होता कीं ताटकावधाचे वेळीं राम फक्त बारा वर्षांचा होता तरी त्याचे बाण मला सोसवले नाहींत. रामाला अवतारस्वरूप मिळाल्यावर त्याचे माहात्म्य वाढवण्याचा हा प्रकार वाटतो.

सीतेच्या मागणीवरून राम हरणाच्या मागे गेला तेव्हां सीतेच्या रक्षणाचे काम त्याने लक्ष्मण व जटायु यांच्यावर सोंपवले होते. पण जटायु जवळपास नव्हताच. लक्ष्मणानेहि रामाच्या मदतीला जाण्याआधी 'आपण त्यासाठी जटायुला पाठवूं' असें सीतेला

सुचवले नाहीं. सीतेने तें मानले नसतेच हे वेगळे. लक्ष्मणाने जाताना जटायूला 'तूं सावध रहा' असेहि सुचवले नाहीं. कारण तो जवळ नव्हताच. रावणाने सीतेला उचलल्यावर तिचा विलाप झाडावर झोपलेल्या वृद्ध जटायूच्या कानीं पडला व तो खडबडून जागा झाला असें रामायण म्हणते. जटायूने स्वत:च 'मी तुमच्या आश्रयाने राहीन व सीतेच्या रक्षणात मदत करीन' असे रामाला म्हटले होते. तेव्हां तो जवळपास पण स्वतंत्रच राहत असणार. सीतेने विलाप करतानाहि त्याला हाका मारल्या नव्हत्या. तो सरसावून आल्यावरहि 'तुला रावणाशी लढणे जमणार नाही, तूं फक्त घडालेली हकीगत रामाला सांग' असे सीता त्याला म्हणाली. कारण तो वृद्ध होता. मात्र त्याने रावणाबरोबर निकराची झुंज दिली तीहि इतकी प्रखर कीं त्याने रावणाचा सारथी मारला, रथाला जोडलेलीं गाढवें मारलीं व रथाचाहि पूर्ण विध्वंस केला. रावणालाहि फार जखमी केले. मात्र त्याचे बळ अखेर कमी पडून प्राणांतिक जखमा होऊन तो पडला. सीतेने पुन्हा जोराने विलाप केला, हेतु हा कीं जवळपास कोणी असेल तर त्याला ऐकूं जावें. रावणाचा रथ वा विमान पूर्ण नष्ट झाले होते. मात्र तरीहि रावण सीतेला घेऊन आकाशमार्गाने लंकेला गेला असें रामायण म्हणते, हे आकाशमार्गाने जाणे म्हणजे काय याचा कांही उलगडा मला सुचलेला नाहीं. वाटेतील एका पर्वतावर काही वानर बसलेले (हनुमान, सुग्रीव वगैरे) सीतेला दिसले. त्यानाहि रावण सीतेला घेऊन चाललेला दिसला पण त्यांची रावणाशीं गाठ पडली नाहीं तेव्हां ते बसलेल्या शिखरापेक्षां उंचावरून जाणाऱ्या वाटेने रावण गेला असे म्हणावे लागते. रावण घेऊन जात असताना सीतेने त्याची परोपरीने निर्भर्त्सना केली व 'तुझा मृत्यु अटळ आहे' असें बजावले. सीतेने वस्त्रांत गुंडाललेले काही दागिने वानरांकडे टाकले हें रावणाच्या लक्षात आले नाही कारण त्याने ते थांबवले नाहीं. अखेर रावण सीतेला घेऊन लंकेला पोचला व सरळ अंत:पुरांत जाऊन सीतेला तेथे ठेवून पहारेकरणींना ताकीद दिली कीं 'तिला पाहिजे असेल तें द्या आणि त्रास देऊं नका. वैदेहीला अप्रिय लागेल असें बोलणाऱ्या व्यक्तीला आपला जीव प्यारा नाही असे मी समजेन' रावणाबद्दल आपल्या कल्पनांशी हें सुसंगत नाहीं पण रामायणच हे म्हणते! सीताहरण माघ व. अष्टमीला झाले असे पद्मपुराणात म्हटले आहे. मात्र रावण कोणत्या तिथीला लंकेला पोंचला ते सांगितलेले नाही त्यामुळे प्रवासात किती काल गेला ते कळत नाहीं.

सीतेची व्यवस्था लावून रावण लगेच आपल्या सहाय्यकांना भेटला व खराच्या सैन्याचा नाश झाल्याचे सांगून त्यांना म्हणाला कीं तुम्ही जनस्थानाला जा. रामाने खराला

मारल्यामुळे मला फार राग आला आहे व रामाला मारूनच तो शांत होईल. जनस्थानात राहून रामाची खबर तुम्ही मला कळवा. सीतेला पळवून आणल्याचे मात्र त्याना सांगितले नाही. रामाशी युद्ध आता अटळ आहे हे रावणाने जाणले होते व तो तयारीला लागला होता.

रावणाने लंकेचे वैभव सीतेला अनेक प्रकारे ऐकवले व राम लंकेला येऊच शकणार नाही तेव्हां तूं आतां मला वश हो असे विनवले. सीतेने त्याला साफ झिडकारले. रावणाने अखेर तिला अशोकवनात 'राक्षसिणींच्या' पहाऱ्यात ठेवले. त्याना आज्ञा दिली कीं तिला भीति घाला, मग गोड बोला, काही करून तिचा अहंकार दूर करा व तिला वश करा. कोणत्याही मार्गाने सीता वश होत नाही हे दिसून आल्यावर त्याने अखेर सीतेला एक वर्षाची मुदत दिली व त्यानंतरहि ऐकले नाहीस तर खाऊन टाकीन असा धाक घातला.

रावणाने सीतेला एक वर्षाची दीर्घ मुदत दिली होती हा एक महत्वाचा उल्लेख आहे. त्यावरून रावणाचा खरा हेतु स्पष्ट होतो. राम सीतेला सोडवण्याचा निकराचा प्रयत्न करील हे उघड होते, मात्र तो अयोध्येच्या वा इतर कोणाच्याही मदतीने लंकेवर चाल करूं शकला तर होणारे युद्ध लंकेत, म्हणजे रावणाला अनुकूल अशा भूमीवर झाले असते. त्याला सीता हवी होती असे मला मुळीच वाटत नाही. तसे असते तर एक वर्ष थांबण्याची गरज नव्हती, ती हातांत आलीच होती! त्याचे 'कपटी, कामी, लंपट, राक्षस' हे वर्णन निव्वळ तो रामाचा शत्रु म्हणून केलेले आहे. जनस्थानाऐवजी रामाबरोबरचे निर्णायक युद्ध त्याला लंकेत हवे होते हा त्याचा सीतेला पळवून आणण्यामागील खरा हेतु होता असे माझे मत आहे. प्रत्यक्षात राम लकेत पोचून युद्ध होईपर्यंत एक वर्षाहूनहि जास्त काळ गेला. सीताहरण माघ व. अष्टमीस झाले, हनुमान पुढील वर्षाच्या मार्गशीर्षात लंकेस पोचला व त्यानंतर राम ससैन्य लंकेस पोचून युद्ध होऊन फाल्गुन-अखेर / चैत्राच्या सुरवातीला रावणवध झाला (विजयादशमीला मुळीच नाहीं!). मात्र वर्ष संपले तरी रावणाने सीतेवर अत्याचार केला नाही यावरून त्याचा हेतु राजकीय व युद्धाच्या डावपेचांचा भाग होता हे उघड आहे.

विजयादशमीला रावणवध झाला अशी समजूत आहे. उत्तरभारतात विजयादशमीला रामलीला व रावणवधाची दृश्ये दाखवली जातात. पण खुद्द रामायणातील वर्णनांवरून अशा समजुतीला मुळीच आधार दिसत नाही. हनुमान व सीता यांची भेट मार्गशीर्ष शु. नवमीला झाली असा उल्लेख आहे. त्यानंतर वानरसैन्य समुद्र ओलांडून लंकेत पोचले, आणि युद्ध उभे राहिले. प्रमुख युद्धप्रसंगांच्या भाषांतरकारांनी ज्या तिथि दिल्या आहेत त्याप्रमाणे फाल्गुन वद्य ३० पर्यंत कुंभकर्ण, इंद्रजित वगैरे सर्व प्रमुख वीरांचा वध

होऊन रावण स्वत: युद्धाला आला असे म्हटले आहे. तेथून पुढे रावणवधापर्यंत आश्विन शु. दशमी म्हणजे विजयादशमी खासच उजाडली नव्हती. रावणवध विजयादशमीला नव्हे तर चैत्राच्या पहिल्या १०-१२ दिवसांतच झाला असला पाहिजे. रावणवधानंतर राम लगेच अयोध्येला परत गेला. रामाचा वनवास चैत्रांत सुरू झाला होता तेव्हां तो चैत्रांत संपला हे सयुक्तिकच आहे. रावणवध व विजयादशमी यांची सांगड कां घातली जाते याचा मात्र उलगडा होत नाहीं.

(विजयादशमीला अर्जुनाने शमीच्या झाडावरील शस्त्रे काढून कौरवांशी सामना केला अशीहि एक समजूत आहे, तीहि सपशेल चुकीची आहे कारण कौरवांचा विराटावरील हल्ला झाला व अर्जुनाने त्यांचा सामना केला तेव्हां 'हा ग्रीष्म चालू आहे' असा स्पष्ट उल्लेख भीष्माचे तोंडी आहे!)

राम मारीचाला मारून घाईघाईने कुटीकडे परत येत असताना वाटेतच लक्ष्मण भेटला. सीतेला एकटी सोडून आपल्या मदतीला आल्याबद्दल रामाने लक्ष्मणालाच दोष दिला. दोघे कुटीकडे परत आले तर सीता दिसेना. दोघे भयभीत झाले. रामतर वेडापिसाच झाला. त्याच्या शोकाचे व संतापाचे सुंदर वर्णन रामायणात आहे. लक्ष्मणाने त्याला कसेबसे समजावले व दोघांनी सीतेचा शोध सुरू केला. काही वेळाने रावण-जटायु संग्रामस्थळापाशी आले. तेथील रक्तपात पाहून रामाने समजूत करून घेतली कीं सीतेला बहुधा राक्षसांनी खाल्ले. लक्ष्मणाने पुन्हा समजावले कीं येथे दिसणाऱ्या खुणांवरून येथे एका वीराचे व एका रथीचे युद्ध झाले आहे. रथ मोडून पडला आहे, गाढवे मरून पडलीं आहेत सारथी मेला आहे व छत्र मोडले आहे. जवळपास शोधल्यावर आसन्नमरण जटायु दिसला. त्याने खेद व्यक्त केला कीं मी रावणाला थोपवूं शकलों नाहीं, तो सीतेला घेऊन गेला. दु:ख बाजूला ठेवून राम-लक्ष्मणांनी जटायूचे दहन केले. रावण सीतेला घेऊन लंकेला गेला एवढे कळले पण लंका कोठे आहे हे रामाला माहीत नव्हते. काय करावे सुचेना.

रामाचा शोक, संताप व विरहदु:ख यांचे अतिशय सुरस वर्णन रामायणात केले आहे. त्याने लक्ष्मणाला म्हटले कीं 'सीता नाही, आता मी अयोध्येला परत येतच नाहीं तेव्हां तूं परत जा.' लक्ष्मणाने कशीबशी त्याची समजूत घातली. असे सुचेल त्या दिशेला दोघे भटकत असताना त्यांची अचानक कबंध नावाच्या राक्षसाशी गाठ पडली. हा महाबलवान, पण विकृत शरीराचा होता असे त्याचे वर्णन केलेले आहे. त्याने दोघानाही अचानक पकडले पण प्रसंगावधान राखून दोघांनी तलवारीने त्याचे दोन्ही हात तोडून टाकले. मरण्यापूर्वी

त्याने सांगितले कीं रावण लंकेला आहे आणि त्याचा सामना करण्यासाठी तुम्हाला मदत मिळवावी लागेल. त्यासाठी तुम्ही वानरराज सुग्रीवाला भेटा. तोही राज्यभ्रष्ट व पत्नीभ्रष्ट आहे तेव्हां एकमेकांना मदत करा.' तो पांपासरोवरानजीक मतंगवनापाशी ऋष्यमूक पर्वतावर भेटेल अशी माहितीहि दिली. हा वेळ पर्यंत रामायणात वानर या समाजाचा उल्लेख केलेला नाहीं त्याअर्थी ते दक्षिण भारतातच असावे असें म्हणतां येईल. हा एक शाकाहारी व अन्न गोळा करणारा पण शेती करण्यापर्यंत प्रगति न झालेला, आर्यांपासून वेगळा, पण 'राक्षसां'प्रमाणे नरमांसभक्षक व यज्ञविरोधक नव्हे, असा बराचसा सुधारलेला मानवसमाज दिसून येतो. पुढे महाभारतकाळापर्यंत हा समाज बदलत जाऊन, आर्यांच्यांत मिसळून गेलेला असावा त्यामुळे कोणाही वानरराजाचा उल्लेख महाभारतांत अजिबात दिसत नाहीं.

रामलक्ष्मण दक्षिण दिशेला गेले व पुष्कळ प्रवासानंतर मतंगवनापाशी पोंचले. पंपासरोवर, किष्किंधा वगैरे परिसर आज कर्णाटकांत असल्याचे मानले जाते. पंचवटीपासून येथपर्यंतचा प्रवास करण्यास राम-लक्ष्मणांना, दोन-अडीच महिने लागले असे दिसते. प्रवासांतील सर्व निसर्गवर्णनात वसंतऋतूचा उल्लेख जागोजागीं येतो. सीतेचे हरण माघ व. अष्ट्मीला झाले व सुग्रीवाची भेट होऊन पुढे वालीचा वध ग्रीष्मऋतूच्या शेवटी असा स्पष्ट उल्लेख असल्यामुळे रामसुग्रीव भेट ग्रीष्म अर्धापाउण संपल्यावर झाली असणार हे उघड आहे. तेव्हा फाल्गुन व चैत्र हे दोन महिने तरी नक्कीच प्रवासात गेले असे दिसून येते. कदाचित रावणहि याच सुमारास लंकेला पोंचला असेल!

मतंगवनात मतंग ऋषींच्या वेळेपासून रहाणारी शबरी यावेळी रामाला भेटली. तिने केलेल्या साध्या-सुध्या सत्काराचा रामलक्ष्मणांनी स्वीकार केला व मग ते पंपासरोवराकडे गेले. मतंगऋषींच्या शापामुळे वाली त्याच्या जवळपासहि फिरकत नव्हता म्हणून सुग्रीव व त्याचे सहकारी, हनुमान व इतर, तेथेच आसरा घेऊन रहात होते. त्याना भेटण्याचा रामाचा बेत होता.

येथे अरण्यकांडातील कथाभाग संपला. पुढील किष्किंधाकांडाची सुरवात राम-सुग्रीवांच्या भेटीपासून होते. ती पुढे पाहूं.



# किष्किंधा कांड

या कांडात वर्णिलेल्या कथाभागाचे दोन स्पष्ट भाग जाणवतात. राम-लक्ष्मण व सुग्रीव यांची भेट, मैत्री व परस्परांस मदतीचीं आश्वासने, रामाच्या हस्ते वालीचा मृत्यु, सुग्रीवाने किष्किंधेत व रामाने पर्वतगुहेत पर्जन्यकाळ काढणे व नंतर सुग्रीवाने सीतेच्या शोधासाठी वानराना सर्वत्र पाठवणे हा एक भाग आणि इतर दिशाना गेलेल्या वानराना अपयश पण दक्षिण दिशेला गेलेल्या हनुमान अंगदाना समुद्रकिनाऱ्यापर्यंत पोचण्यात यश व मग हनुमानाने समुद्रपार होण्यासाठी सज्ज होणे हा दुसरा भाग. पहिला भाग सुस्पष्ट आहे. वालीमृत्यु हा त्यातील प्रमुख प्रसंग आहे. (मी मुद्दामच वालीवध असा शब्दप्रयोग टाळला आहे.) दुसऱ्या भागांतील अनेक स्थलवर्णने काव्यमय असलीं तरी न उलगडणारीं आहेत. मी त्याबद्दल काही लिहिणार नाही. राम-लक्ष्मण सुग्रीवाला भेटण्याच्या हेतूने मतंगवनाच्या परिसरात पोचले. ऋष्यमूक पर्वतावर आसरा घेतलेल्या सुग्रीव, हनुमान व इतरांनी त्याना पाहिले व हे कोण असतील हे त्याना कळेना. हे तरुण, सुदृढ व धनुष्यबाण धारण करणारे मानव आपल्याला मारण्यासाठी वालीकडून आले असावे अशी सुग्रीवाला भीती वाटली कारण तो सदैव वालीच्या भीतीने ग्रस्त होता व जीव मुठीत धरून या भागात वावरत होता. त्याने हनुमानाला सांगितले कीं तू नीट शोध घे कीं हे कोण व काय हेतूने येथे आले आहेत. त्याने हनुमानाला मार्मिक सूचना केली कीं त्यांच्याशी बोलताना अशी काळजी घे कीं तुझे मुख माझ्या दिशेला असेल म्हणजे मला लांबूनहि कळेल कीं हे मित्र कीं शत्रु! हनुमान राम-लक्ष्मणांपाशी आला. त्याने आपला व सुग्रीवाचा परिचय करून दिला व तुम्ही कोण अशी विचारणा केली. त्यावर रामाने खुलासा केला कीं आम्ही सुग्रीवाच्या सहाय्याची अपेक्षा धरून त्याला भेटण्यास आलो आहोत. मग हनुमानाने सुग्रीवास आश्वासन देऊन राम-सुग्रीव भेट घडवून आणली. परस्परांनी आपली हकीगत व मदतीची अपेक्षा एकमेकांस सांगितली तेव्हां सहजच दिसून आले कीं दोघांनाहि एकमेकांची गरज आहे. सुग्रीव-वाली यांचेमधील कलहाची हकीगत ऐकल्यावर वालीची बाजू ऐकण्याची वाट न पाहतां रामाने खुशाल सुग्रीवाला वचन दिले कीं मी तुझ्यासाठी वालीला मारीन! सुग्रीवानेहि वचन दिले कीं सीतेच्या शोधामध्ये मी व माझे सर्व अनुचर संपूर्ण सहकार्य़ करूं सीतेने वानरांकडे फेकलेलीं वस्त्रे-आभूषणे समोर ठेवलीं गेलीं व तीं ओळखून रामाने अपार शोक केला. परस्परांनी

वारंवार मदतीच्या आणाभाका घेतल्या. हनुमानाने मध्यस्थाचे काम उत्तम पार पाडले व येथून पुढे प्रत्येक प्रसंगात सुग्रीवाचे व रामाचे हित सारख्याच तत्परतेने सांभाळले. रामाने प्रथमच कळलेल्या वाली-सुग्रीव कलहात, न्याय-अन्याय ठरवण्यात वा वालीला भेटण्यात वेळ न घालवता, सरळ एकतर्फी सुग्रीवाची बाजू घेतली, असे कां केले याचा थोडा उहापोह करणे आवश्यक आहे.

वाली-सुग्रीवांचेमधील कलहाबद्दल रामाला पूर्वीची काहीहि माहिती नव्हती. वानर हा समुदाय पशूंचा खासच नव्हता कारण त्यांचा व मानवांचा खुलासेवार वाद आणि संवाद होऊं शकत होता. मात्र उत्तर भारतातील ज्या मानवसमूहातून राम आला होता त्यांचा व वानरकुळांचा संबंध आलेला नव्हता. उलट रावणाचा व वाली-सुग्रीवांच्या वानरसमाजाचा संबंध व विग्रह होता असे वर्णनावरून स्पष्ट दिसते. या समाजाचे रीतिरिवाज रामाला अपरिचित होते. वाली व सुग्रीवांचा कलह ही रामायणातील वर्णनावरून एक दुर्दैवी घटना होती. वालीचा सुग्रीवावर राग होण्यास त्याच्या दृष्टीने सबळ कारण घडले होते कारण वालीची वाट पहात न बसतां त्याने राज्य स्वीकारले होते. मात्र तरीहि वालीने सुग्रीवाला ठार मारले नव्हते तर राज्याबाहेर घालवले होते. राज्यावर वालीचाच अधिकार होता. सुग्रीवाची पत्नी वालीने बळकावली होती हा त्याच्यावर प्रमुख आरोप होता. मात्र पूर्वी वाली गुहेत अडकला असताना व (लोकाग्रहास्तव) राज्य चालवताना व वालीवधानंतर सर्वाधिकारी झाल्यावर सुग्रीवानेहि वालीची पत्नी तारा हिला (तिच्या इच्छेने कीं इच्छेविरुद्ध?) पत्नीपद दिलेच. अर्थ इतकाच घेतला पाहिजे कीं वानरसमाजात पतिपत्नी नाते काहीसे ढिलेच होते! त्यामुळे वालीचा अपराध वधाची शिक्षा देण्याएवढा घोर नक्कीच म्हणतां येत नाही आणि रामाला वालीला मारण्याचा काही खास नैतिक अधिकार होता असा दावा करता येत नाही. रामाने सुग्रीवाला वचन दिले त्याचे कारण वेगळे शोधले पाहिजे.

रामाला स्पष्ट दिसत होते कीं सीतेच्या शोधासाठी व रावणावर स्वारी करण्यासाठी मोठे मनुष्यबळ लागणार होते. ते अयोध्येहून मिळवतां आले असते पण फार वेळ गेला असता. त्यापेक्षा जवळचा मार्ग म्हणजे दक्षिण भारतातील या प्रबळ वानरसमाजाला आपल्याकडे वळवणे. वालीकडेच मदत मागितली असती तर कदाचित त्यानेहि दिली असती. पुढे वालीने मरणापूर्वी तसे रामाला म्हटले देखील. पण 'गरजू' म्हणून वालीपुढे जाण्यापेक्षा 'उपकारकर्ता' म्हणून सुग्रीवाचे साहाय्य घेणे जास्त सन्मानाचे! त्यामुळे वाली-सुग्रीवांच्या कलहाची कथा ऐकल्यावर, योग्यायोग्य, नैतिक-अनैतिकतेचा घोळ घालत

न बसतां रामाने खुशाल सुग्रीवाला वचन दिले कीं 'मी तुझ्या वतीने वालीचा वध करीन' व त्या बदल्यात सुग्रीवाकडून सीतेचा शोध व सुटका यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे वचन मिळवले.

रामाने वालीला मारण्याचे वचन दिले खरे पण सुग्रीवाला खात्री पटली नाही कीं महाबली वालीचा राम बाणाने वध करूं शकेल कीं नाहीं? मग रामाने आपल्या धनुष्याची ताकद एका सालवृक्षावर बाण सोडून दाखवून दिली. एक बाण सात वृक्षांना भेदून गेला हे रामायणातील वर्णन मला अर्थातच अतिशयोक्त वाटते त्यामुळे भावार्थ लक्षात घ्यावयाचा. सुग्रीवाची खात्री पटल्यावर त्याने रामाच्या सांगण्याप्रमाणे, त्याच्यावर विसंबून, किष्किंधेत जाऊन वालीला युद्धाचे आव्हान दिले. दोघांचे जोरदार द्वंद्व झाले. राम वालीला बाण मारील हा सुग्रीवाचा भरवसा फोल ठरला. शेवटी मार खाऊन सुग्रीवाला पळावे लागले. 'तुम्ही बाण कां मारला नाही आणि मारायचा नव्हता तर मला कशाला भरीला घातले' असे सुग्रीवाने रामाला रागावून विचारले. रामाने सारवासारव केली कीं तुम्ही दोघे इतके सारखे दिसत होतां कीं मला ओळखूं येईना व उगीच तुला इजा होऊं नये म्हणून मी हात उचलला नाही. मला वाटते कीं रामाचे मन द्विधा झाले असावे कीं आपण असें लपून राहून बाण मारावा कीं नाहीं?

मग रामाने पुन्हा सुग्रीवाला खात्री दिली कीं पुन्हा वालीला आव्हान दे, यावेळी मी नक्की बाण सोडीन. मग हनुमानाने सुग्रीवाच्या गळय़ात एक फुललेली वेल हारासारखी खुणेसाठी घातली! सुग्रीवाने पुन्हा धीर धरून वालीला आव्हान दिले. वाली त्याच्या गर्जना ऐकून संतापला व द्वंद्वाला निघाला. पत्नी तारेने त्याला सावध केले कीं हल्लीच तुमच्याकडून मार खाऊन पळालेला सुग्रीव लगेच पुन्हा आव्हान देतो आहे तेव्हां त्याला कोणीतरी जबरदस्त मदतनीस मिळाला असावा तेव्हां एकट्यानेच द्वंद्वाला जाऊं नये. मात्र सल्ला न जुमानतां वाली युद्धाला गेलाच. रामायण म्हणते कीं वालीच्या अंगावर आभूषणे होतीं व गळयात सुवर्णमाला होती व सुग्रीवाच्या गळयात फुलांची माळ होती त्यामुळे यावेळी रामाला ओळख पटण्याला अडचण पडली नाही! नवल वाटते कीं पहिल्या वेळी हीं आभूषणे वालीच्या अंगावर नव्हतीं काय? दुसरी गोष्ट म्हणजे वालीचा पुत्र अंगद चांगला जाणता झालेला होता व सुग्रीवाला अद्याप अपत्य नव्हतें तेव्हां दोघे जुळे तर नव्हतेच पण वयांतही पुष्कळ फरक असावा. (चंद्रकांत व सूर्यकांत हे मराठी सिनेनट खूप सारखे दिसत खरे पण वयाचा फरक लपत नसे.) तेव्हा पहिल्या वेळी रामाला ओळख पटली

नाही हे खरे नव्हे! द्विधा मनस्थिति हे कारण! यावेळी अर्थात रामाचा बाण वर्मी लागून वाली कोसळला.

वालीचा वध ग्रीष्म ऋतूच्या शेवटी झाला असा स्पष्ट कालनिर्देश केलेला आढळतो. मात्र महिना, तिथि सांगितलेली नाही. सीताहरण माघ वद्य अष्टमीला झाले होते, त्यानंतर जवळपास तीन महिन्यांचा काळ लोटला होता.

वाली घायाळ होऊन कोसळल्यावर त्याला दिसले कीं आपल्याला रामाचा बाण लागला आहे. त्याने अनेक प्रकारे रामाला वात्ताडन केले. 'माझे तुमचे काहीहि भांडण वा वैर नसतां, मी तुमच्या राज्याला उपद्रव दिलेला नसतां व मी दुसऱ्याशी युद्ध करण्यात गुंतलो असतां, लपून राहून मला मारण्याचे तुम्हाला काय कारण? जर आपण युद्धस्थळी माझ्यासमोर येऊन युद्ध केले असते तर माझ्याकडून नक्कीच मारले गेले असतां. सीतेच्या मुक्तीसाठी तुम्हाला मदत पाहिजे होती तर मीहि समर्थ होतो. तुम्ही मला अधर्माने मारले आहे ते कां? त्याचे कारण विचार करून मला सांगा' असा स्पष्ट जाब विचारला.

यावर रामाने दिलेले उत्तर पूर्णपणे गोलमाल स्वरूपाचे आहे. वालीवर ठेवलेल्या अनेक निरर्थक आरोपांपैकी 'तूं सुग्रीवाच्या पत्नीशीं, जी तुला पुत्रवधूसारखी आहे, कामभोग घेतोस' हा एकच आरोप खरा होता. मात्र एकीकडे तूं शाखामृग आहेस म्हणून तुझी शिकार करण्याचा क्षत्रिय या नात्याने माझा धर्म आहे' असे म्हणावयाचे तर दुसरीकडे त्याच्या वर्तनाला सुसंस्कृत मानवसमाजाची नीतिमूल्ये लावावयाची हा प्रकार अशोभनीय होता. 'मी लपून कां मारले कारण तूं शाखामृग म्हणून तुझी शिकार केली' असे समर्थन केले कारण लपून लढण्याचे दुसरे योग्य कारण देतांच येत नव्हतें! जो आरोप खरा होता तो नंतर सुग्रीवालाहि लागू झाला होता पण त्याला रामाने दोषहि दिला नाही वा शासनहि केले नाहीं. खरे कारण एकच होते कीं वालीला मारून सुग्रीवाला आपलेसे करून घेणे.

रामाचे समर्थन पटो वा न पटो, वालीचा मृत्यु अटळच होता. त्याच्या मृत्यूनंतर तारेने अपार शोक केला. तिनेहि रामाची निंदा केली. हनुमानाने अखेर तिची कशीतरी समजून घातली. आता सुग्रीवाला पश्चात्ताप झाला. 'वालीच्या मनात मला मारून टाकण्याचे कधीहि आले नाही' अशी त्याने स्पष्ट कबुली दिली. 'मलाहि मारून टाका' असे तारेने रामाला विनवले. राम व सुग्रीवाने तिचे सांत्वन केले.

वालीची उत्तरक्रिया झाली. (हा वानरसमाज आर्यांच्या चालीरीती पाळणारा कसा काय?) त्यानंतर सुग्रीवाला राज्याभिषेक झाला. मात्र वनवासाचे बंधन असल्याचे कारण सांगून रामाने किष्किंधेत जाण्याचे नाकारले. या सर्वामध्ये आणखी काही काळ गेला. 'आता श्रावण महिना सुरू झाल्या'चा रामाचे तोंडी उल्लेख येतो. 'आता वर्षाकाळ असल्यामुळे कार्तिकमासापासून तूं युद्धप्रयत्नाना लाग' असे रामाने सुग्रीवाला म्हटले. तुंगभद्रेच्या जवळील प्रस्रवण पर्वताच्या गुहेत राम-लक्ष्मण जाऊन राहिले.

वर्षाकाळ संपेपर्यंत राम-लक्ष्मण त्या गुहेच्या आश्रयाने राहिले. रामाला शोक वाटला कीं लक्ष्मण त्याची समजूत करी. शरदऋतु संपल्यावरच रावणावर स्वारी करतां येणार होती. तोवर स्वस्थ बसणे भागच होते.

किष्किंधेत सुग्रीव तारा-रुमा यांच्यासह कामभोगात मग्न होता. शरद संपत आल्यावर हनुमानाने त्याला कर्तव्याची आठवण करून दिली. हनुमान हा राम व सुग्रीव या दोघांचाहि खरा हितकर्ता होता. मग सुग्रीवाने वानरवीर नील याचेकडून सर्व वानरसमाजाला एकत्र येण्याचे आदेश कळवले.

सुग्रीवाकडून काही कळत नसल्यामुळे रामाला राग आला. 'सुग्रीव काही करीत नाही तर लक्ष्मणा तूं जाऊन त्याला आठवण दे व निष्क्रिय राहिलास तर वालीप्रमाणे मी तुलाहि शासन करूं शकतों असे सांग' असे त्याने लक्ष्मणाला म्हटले. लक्ष्मणाला खूप राग आला पण रामानेच त्याला संयम न सोडण्यास सांगितले. लक्ष्मणाने किष्किंधेस जाऊन सुग्रीवाला कडक भाषेत निरोप कळवला. सुग्रीव अजूनहि कामभोगातच दंग होता. हनुमानाने पुन्हा कर्तव्याची जाणीव करून दिली. 'रामाने लोकापवादाची पर्वा न करतां तुझ्यासाठी वालीला मारले' याची जाणीव करून दिली. (वालीचा 'वध' हा रामायणकर्त्याच्या मतेहि दोषास्पद होता हे येथे स्पष्ट सूचित होते!)

लक्ष्मणाचा निरोप मिळाल्यावर सुग्रीवाला भय वाटले. त्याने तारेला लक्ष्मणाला समजावण्यासाठी पाठवले. तिने सांगितले की सुग्रीव स्वस्थ बसलेला नाही. लक्ष्मणाने तरीहि राग सोडला नाही तेव्हां वालीकडून पूर्वी ऐकलेले रावणाचे सैन्यबळ त्याच्या निदर्शनास आणले व मोठ्या सैन्याशिवाय युद्ध विफल होईल हे दाखवून दिले. वानरसमाजाला एकत्र येण्याचे आदेश पाठवलेले आहेत हेहि सांगितले. मग लक्ष्मणाचा राग निवळला. सुग्रीवानेहि विनम्रभाव धरला. हनुमानाकडून पुन्हा सर्व वानरवीरांना समज

देऊन दहा दिवसांत किष्किंधेला जमण्यास सांगितले. लक्ष्मण व सुग्रीव दोघानी सैन्य जमत आहे असे रामाला कळवल्यावर राम आनंदित झाला. 'सीतेच्या जीविताचा व रावणाच्या निवासस्थानाचा निश्चित ठावठिकाणा लागल्यावर मग पुढचे बेत आखूं' असे त्याने म्हटले. कितीहि शोक असला तरी रामाचे परिस्थितीचे भान सुटलेले नव्हते! सुग्रीवाच्या मदतीशिवाय आपण एकट्याने काही करू शकत नाही हे त्याला स्पष्ट दिसत होते.

वानरसमाजाचे प्रमुख किष्किंधेत जमल्यावर, सुग्रीवाने त्याना दिशा वाटून देऊन सीतेचा तपास करण्यासाठी सर्वत्र पाठवले. सीतेला रावणाने नेले आहे हे खरेतर माहीत होते तरीहि सर्व दिशा धुंडाळण्याचे ठरले याचे कारण बहुधा असे कीं रावणाने सीतेला लंकेलाच नेले कीं इतर कोठे याबद्दल खात्री नव्हती. बहुधा खुद्द लंका कोठे आहे व तेथे कसे पोचायचे याचीहि खात्रीलायक माहिती वानरसमाजाला नसावी. राम-लक्ष्मणांना तर ती नव्हतीच. सर्वत्र शोध घेण्याची व्यवस्था केली तरी खुद्द सुग्रीवपुत्र अंगद व हनुमान यांच्या नेतृत्वाखालील समुदाय दक्षिण दिशेला पाठवला गेला तेव्हां लंका त्याच बाजूला कोठेतरी असावी असा तर्क झाला असावा. सर्व वानरप्रमुखांना एक महिन्याची मुदत दिलेली होती.

सुग्रीवाने वानरप्रमुखांना त्यांच्या वाट्याच्या दिशेला कोणता भूप्रदेश लागेल याचे सविस्तर वर्णन ऐकविले. ते वाच्यार्थाने घेतले तर काहीच अर्थबोध होत नाही. त्यामुळे ते काल्पनिक वाटते. रामायणकाळी सर्व भारतदेशाच्या भौगोलिक स्वरूपाचे यथार्थ ज्ञान असणे असंभवच म्हटले पाहिजे.

अंगद व हनुमान यांच्या पुढारीपणाखाली गेलेल्या वानरसमुदायाच्या खडतर प्रवासाचेहि सविस्तर वर्णन केलेले आहे तेहि लाक्षणिक अर्थानेच घ्यावे लागते.

महत्वाची गोष्ट म्हणजे सर्व कष्ट सोसूनहि सीतेचा ठावठिकाणा न लागल्यामुळे अंगद व इतर वानर फार निराश झाले. आपण हात हलवीत परत गेलो तर सुग्रीवाचा कोप होईल या भीतीने अंगद व इतरानी असा विचार मनात आणला कीं आपण परत जाऊंच नये! त्यावर हनुमानाने समजावून सांगितले कीं 'तुम्ही परत गेलां नाही तरी सुग्रीवापासून तुम्ही कसे वांचाल? तुम्हाला शोधून काढून तो तुम्हाला कठोर शिक्षा केल्यावांचून राहणार नाही. तेव्हां धीर धरून प्रयत्न चालू ठेवलेच पाहिजेत.'

पुढील प्रवासामध्ये वानरगण एका मोठ्या गुहेत अडकले व मग त्या गुहेच्या स्वामिनीच्या कृपेनेच त्यांना बाहेर पडण्याचा मार्ग मिळाला असे वर्णन आहे. किष्किंधेपासून

पूर्व किनाऱ्यापर्यंत अशी कोणती पर्वताची ओळ व प्रचंड गुहा त्यांना आड आली असेल याचा काहीहि तर्क करतां येत नाही. त्यामुळे ही वर्णने 'काव्य' म्हणून सोडून देणे भाग आहे. अखेर या वानरगणाची गाठ जटायूचा भाऊ संपाति याचेशी पडली व त्याचेकडून त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली कीं लंका समोर दिसणाऱ्या समुद्रापलिकडे आहे व सीता लंकेतच आहे. संपाति हा गृध्र होता व त्याच्या दीर्घ व तीक्ष्ण दृष्टीमुळे त्याला हे सर्व प्रत्यक्ष दिसत होते असे रामायण म्हणते. हे सर्व लाक्षणिक अर्थानेच घेतले पाहिजे. या भागात समुद्रतीरावर असणाऱ्या मानवसमाजाला लंकेत घडणाऱ्या घटनांची काही माहिती असणे सयुक्तिक वाटते व संपाति त्यांच्या संपर्कात असावा असे मानता येईल.

वानर समाज समुद्रतीरावर पोंचला व आतां समुद्र ओलांडून कसे जाणार याची चर्चा सुरू झाली. सर्व प्रमुख वानरांनी आपले बळ (वय झाल्यामुळे) पुरे पडणार नाही असे म्हटल्यामुळे शेवटी अंगद कीं हनुमान एवढाच पर्याय उरला तेव्हां अंगद हा युवराज व समर्थ असला तरी वयाने व अनुभवाने लहान म्हणून हे काम हनुमानानेच अंगावर घेतले. सीतेच्या शोधासाठी निघताना हनुमानाने रामाकडून खुणेची अंगठी मागून घेतली होती, इतर दिशांना गेलेल्या समुदाय पुढाऱ्यांनी तसे केलेले नव्हते. तेव्हां दक्षिण हीच तपासाची महत्वाची दिशा आहे हे सर्वांनी ओळखलेले होते असे दिसते.

हनुमानाने समुद्र ओलांडण्यासाठी 'उड्डाण' केले असे रामायण म्हणते. ते वाच्यार्थाने घेतले तर प्रष्नच उरत नाही. तर्क करावयाचा तर त्या काळी भारत व लंका याना जोडणारी एक उंचवट्यांची रांग समुद्रात आज आहे तशीच पण आजच्यापेक्षा जास्त वर असली पाहिजे व या छोट्यामोठ्या बेटांच्या रागेचा उपयोग करून, काही पोहून, काही उड्या मारून, धावून, चालून हनुमान लंकेला पोचला असला पाहिजे. मात्र ते सोपे खासच नव्हते. त्याकाळी होड्या होत्या काय? असणार कारण रामाने गंगा नदी गुहकाच्या नौकेवरूनच पार केली होती. मात्र गंगा वेगळी आणि समुद्र वेगळा! पण कठीण कां होईना पण समुद्र ओलांडण्याचा काहीतरी मार्ग असलाच पाहिजे कारण खुद्द रावण व त्याचे सैन्य, भारतात ये-जा करतच होते! या प्रश्नाचा उलगडा होणे कठीण आहे तेव्हां तो वाचकांच्या कल्पनाशक्तीवरच सोडणे आवश्यक आहे.

किष्किंधाकांडाची येथे अखेर होते.

# काही प्रतिक्रिया

ChinmayJanuary 17, 2009 at 4:37 PM

फार सुंदर लिहिल काका. प्रश्न फक्त एकच तो असा कि हृष्याशृंग ऋषि ह्यांना रोमपाद राजाने आपली मुलगी शांता दिली . ही शांता दशरथ राजाची मुलगी होती आणि रोमपाद नि तिला दत्तक घेतली \होती अस काही माझ्या वाचनात आल आहे . त्या वर थोडा प्रकाश टाकळ?

प्रभाकर फडणीसJanuary 17, 2009 at 7:45 PM

बालकांड पुन्हा एकदा नजरेखालून घातले. आपण म्हणता तसा कोणताही उल्लेख मला दिसला नाही. शांता ही रोमपादाचीच मुलगी असाच स्पष्ट उल्लेख आहे. दशरथाचा उल्लेख तोपर्यंत अपत्यहीन असाच केला आहे.

ChinmayJanuary 18, 2009 at 5:17 PM

नमस्कार काका कदाचित तुम्ही रेफर केलेल्या बाल कांड मधे ही माहिती नसेल. पण याच उल्लेख मात्र रामायणात आहे मला नक्की आठवत नाहीए की ते वाल्मिकी रामायण होत कि कांबन किंवा तुलसीदास रचीत रामायण. नेट वर माहिती सर्च करताना हा लिंक सापडला.

http://www.geocities.com/mahaabhaarat/witnesses/index-n-z.htm ह्या लिंक वर महाभारत आणि रामायणात असणाऱ्या व्यक्ति रेखांचा संक्षिप्त

परिचय दिलेला आहे त्यातच रोम पाद राजा ची माहिती दिली आहे. अर्थात ह्या माहितीचा नक्की स्रोत मी पुढे देईनच.

प्रभाकर फडणीसJanuary 18, 2009 at 7:29 PM

मी प्रथमच सांगून टाकले आहे कीं माझे वाचन वाल्मिकिरामायणाच्या मराठी भाषांतरापुरतेच आहे. आपली माहिती विचारात घेतली तर दशरथाला बऱ्याच पूर्वी अपत्य झाले होते म्हणावे लागते. कोणत्या राणीला? एकच कन्या झाली व तीहि दशरथाने दत्तक देऊन टाकली हे जरा चमत्कारिकच वाटते. तसेच या शांतेचा रामायणात पुढे कोठेहि उल्लेख नाही.
मूळ वाल्मिकि रामायणात तसा उल्लेख नसताना तिला दशरथाची कन्या मानणे मला फारसे पटत नाही.

m.e.r.C.u.r.yDecember 30, 2010 at 6:02 PM

ही कथा खरेच माहित नव्हती.. धन्यवाद काका !
तसे माझे वय पाहता, आणि तुम्हीच तुमचा करून दिलेला 'जेष्ठ नागरिक' हा परिचय पाहता, मी तुम्हाला आजोबा म्हणणे जास्त योग्य होईल आहे मला वाटते :)

सुषमेयJuly 3, 2011 at 10:32 PM

’लाजली सीता स्वयंवराला पाहुनी रघुनंदन सावळा’ कोठून आले? हे गाणे लिहिणाराने सीता व द्रौपदी या दोघींच्यात मोठी गफलत केलेली दिसते!

ithe asaha tika nakot.... karan kal wel aand garaj ya sarwanurup sahityanirmiti hote....

KunalApril 2, 2009 at 12:09 PM

मी आपल्या दोन्ही blogs चा नियमित वाचक आहे तसेच मी रामायण व महाभारताचे भाषांतर लहानपणी वाचले आहे . आपल्या सर्वांच्या मनात या सर्व व्यक्तिरेखांच्या काही विशिष्ट प्रतिमा तयार झालेल्या असतात ज्या सामान्यत:black & white अशा असतात. त्यातून बाहेर पडून चिकित्सक दृष्टीने केलेले रामायण व महाभारताचे आपले विश्लेषण फारच सुंदर आहे. असेच लिहित रहा ही सदिच्छा.

1. 

प्रभाकर फडणीसApril 2, 2009 at 7:15 PM

आपल्या प्रतिक्रियेबाबत धन्यवाद. रामायण - महाभारत वाचताना मला हेच जाणवले होते. खुद्द मूळ ग्रंथांतच असलेले स्पष्ट उल्लेख लक्ष देऊन वाचले तर आपल्या, तुमच्या वर्णनाप्रमाणे black and white व्यक्तिप्रतिमांना वेगळे वळण लावतात. आपण राम आणि कृष्ण यांना देवाचे अवतार मानायला सुरवात केल्यापासून त्यांचे मनुष्यत्व हरवून गेले व मग ठाम झालेल्या प्रतिमांना प्रतिकूल वा विसंगत उल्लेखांकडे दुर्लक्ष होऊं लागले असे मला वाटते. मी कोणी विद्वान वा व्यासंगी नाही पण कुतूहल कायम ठेवून वाचलें व लिहिलें. आपल्यासारख्या पुष्कळांना, विशेषत: तरुण पिढीला, माझा दृष्टिकोन आवडतो याचा मला आनंद वाटतो.



m.e.r.C.u.r.yDecember 31, 2010 at 4:08 PM

मी कुठेतरी वाचल्या प्रमाणे, रावणाचा वध रामाच्या हातून लिहिलेला होता, त्यामुळे साक्षात इंद्राच्या सांगण्यावरून कैकयीला रामाला बाहेर धाडले. हा निरोप नारदाने कैकयीला दिला. पण बहुदा तुम्ही लिहिले त्या प्रमाणे, मूळ रामायणात ह्याचा उल्लेख दिसत नाही !

manachemanogatAugust 6, 2009 at 1:20 PM

सर्व पोस्ट वाचतो आहे, आपले आभार कसे मानावेत तेच कळत नाहीत. फार मोलाची माहीती मिळत आहे..

धन्यवाद.. चालु राहुद्या.. अनिकेत



प्रभाकर फडणीसAugust 11, 2009 at 10:04 AM

आपल्या अभिप्रायाबद्दल धन्यवाद. आपण लिहिलेले कोणालातरी आवडले याचा आनंद मोठा असतो.



m.e.r.C.u.r.yDecember 31, 2010 at 4:17 PM

कैकयीच्या पित्याला दिलेले वचन हा भरताने ऐकावे आणि मान्य करावे, म्हणून रामाने केलेला बनाव असू शकतो ! ते सुद्धा सत्यवचनी ह्या उपाधीला गैर ठरवते हे खरेच !

Mrs. Asha JoglekarSeptember 24, 2009 at 12:09 AM

Ramaayanatali wisangati tumhi dakhwali nasatee tar sahaj lakshat hee aali nasati . Eka wegalya uddeshyane lihilele he aapale Ramayan chanach aahe.

ओंकार शरद पारखीSeptember 26, 2010 at 3:00 PM

दुथडी वाहणाऱ्या नद्या या नर्मदा आणि तापी असाव्यात.
चित्रकूट पासून दंडकाराण्याच्या मार्गावर याच दोन मोठ्या नद्या आहेत.

sharayuMay 8, 2010 at 10:20 PM

माझ्या मते रावण हा सुखदुःखाचा लाभ फक्त इंद्रियांद्वारे घेतला जाऊ शकतो असे मानणार्या यज्ञसंस्कृतीचा प्रतिनिधी होता. सुखाची वृद्धी व दुःखाचा निरास यासाठी भौतिक पातळीवरूनच म्हणजे काम्य यज्ञाद्वारेच प्रयत्न झाले पाहिजेत असे ही संस्कृती मानते. राम हा सुखदुःख मनोनिर्मित भावना आहेत असे मानणार्या संस्कृतीचा प्रतिनिधी होता. मनावर ताबा मिळवूनच सुखाची वृद्धी व दुःखाचा निरास शक्य आहे असे ही संस्कृती मानते. या संस्कृतीचा यज्ञाना सरसकट विरोध नव्हता तर केवळ काम्य यज्ञाना विरोध होता. राम-रावण युद्ध या दोन संस्कृतीमधील संघर्ष आहे.

1. anirudhaMay 18, 2010 at 5:18 PM
namaskar kaka........pudhil blog lavakarat lavakar lihava hi vinanti .... yatun kahi mahit nasalelya goshti mahiti zalya... dhanyawad....

2.
Leena ChauhanMay 20, 2010 at 5:19 PM

मला तुमचे लेख खूप आवडतात. पुढिल भागाची आतुरतेने वाट बघत आहे.

ReplyDelete

3. 
प्रभाकर फडणीसMay 21, 2010 at 11:43 AM

धन्यवाद

1. सागर बोरकरJune 8, 2010 at 9:59 AM

फडणीस काका,

युद्ध नेहमीच परकीय भूमीवर करावे. स्वतःच्या भूमीवर करू नये हा युद्धशास्त्रातील महत्त्वाचा नियम महाभारतात बरेचदा उल्लेखलेला आहे त्याअर्थी तो अगोदरच्या रामायणातही प्रचलित असणारच. पण रावणाने यास अपवाद का केलेला असावा? आणि अर्थातच या त्याच्या चुकीमुळेच रामालाही (वानर)सैन्य जमवण्यास पुरेसा वेळ मिळून व पूर्ण शक्तीशाली बनून रावणाचा नाश करता आला असावा.



प्रभाकर फडणीसJune 8, 2010 at 6:33 PM

पौराणिक काळातली युद्धे विध्वंसक नसत, म्हणजे मुलुखाची हानि करणारीं नसत. त्यामुळे दुसऱ्याच्या भूमीवर युद्ध करणे विशेष फायद्याचे नव्हते. लंकेमध्ये रावणाचे सर्व बळ एकवटले होते तेव्हां राम चालून आला तरी संख्याबळ रावणाला अनुकूल राहण्याची शक्यताच जास्त होती. रामाला वानरांचे एवढे मोठे सैन्य मदतीला येईल अशी त्याची कल्पना नसावी. रावणाचे व वानरांचे पूर्वीचे मोठे संघर्ष नव्हते. स्वत:ला अनुकूल अशा भूमीवर युद्ध ओढून आणण्याचे प्रसिद्ध उदाहरण म्हणजे शिवाजी-अफझलखान युद्ध किंवा नेपोलिअन-रशिया युद्ध होय.
युद्ध परकीय भूमीवरच करावे असा महाभारतात कोठे उल्लेख आहे तो कृपया कळवावा. माझा ई-मेल पत्ता pkphadnis@yahoo.com असा आहे त्याचा वापर करण्यास हरकत नाही

सागर बोरकरDecember 4, 2010 at 9:08 AM

उत्तमच. किष्किंधाकांडाची जोरदार सुरुवात झाली आहे.

सुग्रीवाची पत्नीही वालीने हिरावलीच होती (भले वानरसमाजात ती प्रथा असेलही) त्यामुळे सम:दुख्खी रामाला सुग्रीव हाच आपल्या बाजूचा वाटणे यात नवल नाही. तसेच प्रथम भेटला तो सुग्रीव त्यामुळेही रामाने त्याचा विचार आधी केला असावा. तसेच वाली हा रावणाचा मित्रही होता असे रावणानेच पुढे म्हटल्याचे स्मरते. (नक्की आठवत नाही).



प्रभाकर फडणीसDecember 6, 2010 at 7:57 PM

आपले काम साधण्यासाठी सुग्रीव जास्त उपयोगी पडेल कारण तो उपकाराखाली असेल हे रामाने जाणले व म्हणून त्याची बाजू न्याय-अन्याय याच्या विचारात न अडकतां घेतली.
वाली व रावण मित्र मुळीच नव्हते पण एकमेकांचे बळ ओळखून वाटेस जात नव्हते इतकेच.

m.e.r.C.u.r.yJanuary 17, 2011 at 9:01 PM

गेल्या महिन्याभरात, वेळ मिळेल तसे मी आपण लिहिलेले दोन्ही ब्लोग वाचत गेलो, आणि मला ते आवडलेही. भक्तीरस मध्ये न आणता, ह्या सर्व थोर व्यक्तींचा माणूस म्हणून केलेला विचार मनःपूर्वक आवडून गेला. तुम्ही असेच लिहित राहा, मी आणि माझ्यासारखे अनेक वाचत राहूच.
महाभारत आणि रामायणाकडे एक वास्तववादी आणि तर्कशुद्ध दृष्टीकोनातून पाहण्याचा माझा स्वतःचाही प्रयत्न होता, त्या साठी मी माझ्या आज्जी कडून महाभारताचे प्रथम दोन खंड (तुमच्या चित्रात आहेत तेच) आणले हि होते, मात्र कामाच्या व्यापात कधी जमलेच नाही. आपण लिहित असलेल्या लेखांमुळे त्यामुळेच विशेष आनंद मिळत आहे.

रामायणावरील 'वास्तव रामायण' हे प. वि. वर्तक ह्यांनी लिहिलेले पुस्तक आपण वाचले आहे काय ? मला ते वाचण्याचा योग आला होता, मी सुरुवातही केली होती, मात्र ते ज्यांचे होते त्यांना परत द्यावे लागले. मात्र, उल्लेखनीय बाब अशी कि त्यांनीही रामायणावर चमत्काराच्या पलीकडे जाऊन लिखाण केले आहे असे वाटते.

विस्तारभयाने थांबतो. मात्र, आपण लिहित राहावे, तुमच्या अभ्यासासाठी आणि लेखनासाठी खूप शुभेच्छा !

N.D.K. NikhilApril 10, 2011 at 5:19 PM

नमस्कार काका,

या मालिकेतील सर्व लेख मी आजच्या दिवसातच संपवले. तुमचे लेखन आणि यामागील तर्क फ़ार अप्रतिम आहेत. आजच्या युगात आपण पौराणिक कथांना थोडेसे तटस्थ नजरेने बघायला पाहिजे आणि त्यासाठी तुमची लेख मालिका फ़ारच उपयुक्त ठरते. तुमच्या या उपक्रमाबद्दल तुमचे शतशः आभार.

या मालिकेतील पुढील लेख लवकरच तुम्ही प्रकाशित कराल ही अपेक्षा!!

शुभेच्छा!!

-निखिल

प्रभाकर फडणीसMay 19, 2011 at 11:49 AM

धन्यवाद.

रामायणावरील लेखन हल्ली थांबले आहे. इतक्या दिवसांनंतर पुन्हा एका तरुण वाचकाची प्रतिक्रिया वाचून खूप बरे वाटले. लेखनामागील माझी भूमिका तरुण वाचकाना योग्य वाटते याचा मला आनंद वाटतो. रामायणाच्या पुढील भागांबद्दल लिखाण माझे हातून केव्हा होईल सांगवत नाही. कदाचित होईलहि. मात्र सांगण्यासारखे काही नजरेला आले तर! बाकी रामकथा सर्वांना परिचित आहेच.

# लेखकाची ओळख



१. नाव. प्रभाकर केशव फडणीस.

२. वय ८३

३. शिक्षण - चिकित्सक समूह हायस्कूल गिरगांव येथून SSC - साल १९५०

- .V. J. T. I. Matunga, Mumbai येथून B. E. (Civil) -साल १९५५

४. व्यावसायिक - खासगी व सरकारी कंपन्या व अणुशक्ति खात्यामध्ये नोकरी. रिचर्डसन-कुडास मधून १९८९ मध्ये निवृत्त.

५ साहित्य, संगीत, संगणक, बुद्धिबळ/ब्रिज व इतरहि काही विषयात स्वारस्य.

६. निवृत्तीनंतर रामायण-महाभारताचे (मराठी भाषांतरे) वाचन, मनन व ब्लॉगलेखन.

७. विलेपार्ले येथील ज्येष्ठनागरिक संघटना - 'सोबती' - या संस्थेत सक्रिय भाग व अनेक विषयांवर व्याख्याने.

८. कौटुंबिक. - सुविद्य पत्नी व दोन उच्चशिक्षित मुलगे. दोघे अमेरिकेत स्थायिक.

९ वास्तव्य - गिरगांव, अंधेरी (पूर्व), व विलेपार्ले. आता अमेरिकेत सॅन रेमॉन व पाम हार्बर येथे मुलांकडे. भारतात येणेजाणे चालू..

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. " ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी" ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!